नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ३६ * * अकोला * बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## निशिकांत दुबेविरोधात मनसे कोर्टात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
हिंदी - मराठीच्या वादाच्या आगीत सातत्याने तेल ओतण्याचा प्रयत्न करणारे भाजप खासदार निशिकांत दुबे यांना अखेर मनसेने कोर्टात खेचले आहे. मनसेच्या नाशिक येथील एका पदाधिकाऱ्याने दुबे यांच्याविरोधात अवमाननेची याचिका दाखल करत त्यांना मनसेच्या स्टाईलने धडा शिकवण्याचा इशारा दिला आहे.

मनसेचे नाशिक शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनी निशिकांत दुबे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात अवमानना याचिका दाखल केली आहे. दुबे यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे कोंबडे यांनी त्यांच्याविरोधात अवमाननेचा दावा दाखल केला आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# सत्यवादी सत्यपाल

आज सत्यपाल मलिक नावाच्या एका सत्यवादीचा अंत झाला. व्यवस्थेविरुद्ध लढणे किती जिकिरीचे आणि कठीण असते हे तुम्हा-आम्हा सर्वांना माहीतच आहे. विशेष म्हणजे सत्यपाल मलिक अनेक दिवस प्रवाहात होते. मोदीजींनी त्यांना जम्मू काश्मीरचे राज्यपालपद बहाल केलेले होते. अत्यंत कठीण काळात जम्मू-काश्मीरचे राज्यपाल म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली याबाबत कोणाच्याही मनात दुमत असणार नाही. हा माणूस प्रवाहपतीत होत नाही हे दिसून आल्यावर नाना कारणांमुळे त्यांच्यावर आरोप होत होते, पण अनेक संकटे येऊनही सत्यपाल मलिक यांनी सत्य सांगण्याचा प्रयत्न कधीच बंद केला नाही. त्यांच्यावर कोट्यवधी रुपयांच्या लाचखोरीचे आरोप करण्यात आले होते. विशेष म्हणजे शंभरपैकी एखाद्या प्रकरणातच काहीतरी यश मिळवणारी इडी त्यांच्या पाठीमागे लावण्यात आली होती, पण या माणसाने शेवटपर्यंत हार मानली नाही. रोखठोक बोलणे हा त्यांचा स्वभाव होता, विशेष म्हणजे तो कोणत्याही व्यवस्थेला हे आवडत नाही आणि पचतही नाही. नुकताच उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिलेले जगदीश धनखड आता सत्यपाल मलिक यांच्यासारखेच वागतील काय, असे म्हटले जात होते. यावरूनच सत्यपाल मलिक हा सत्यतेचा ब्रँड झाला आहे असे सहज दिसून येते. जो झुकता है वो जाट नहीं, असे जाट समाजाबद्दल म्हटले जाते. उपराष्ट्रपती पदावरून पायउतार झाल्यानंतर धनखड यांनी कोणतेही भाष्य अद्याप तरी केले नाही. तरीही ते पुढे मागे आपल्या डोळ्यासमोर सत्यपाल मलिक यांचा आदर्श ठेवतील असे बोलले जात आहे. सत्यपाल मलिक यांच्या प्रकृतीत गेल्या अनेक दिवसांपासून खूपच चढउतार होत होते. चौधरी चरण सिंग यांचे विचार जाणून त्यांचे अनुकरण करणारे चरण सिंग यांचे ते पक्के चेले असलेल्या मलिक यांनी त्यानंतर इतरही काही पक्षात चंचूप्रवेश केला होता. त्यामुळेच त्यांचा प्रभाव पाहता त्यांना थेट राज्यपाल पदावर बसवले गेले. समाजवादी विचार असलेला माणूस सदैव व्यवस्थेच्या विरुद्ध असतो हे आपण अनेकदा बघितलेले आहे. एवढ्या उच्च पदावर आरूढ होऊनही त्यांना निवृत्तीनंतर ज्या प्रकारच्या सोयी सवलती मिळायला हव्या होत्या त्या कधीच मिळाल्या नाहीत. अगदी साध्या दोन खोलीच्या घरात ते राहत होते, त्यांच्यावर कितीही आरोप झाले तरी हा माणूस भ्रष्टाचारी नाही हे या सगळ्या गोष्टीवरून आपोआपच दिसून येत होते. याचा परिणाम असा की त्यांच्यावर कितीही हेत्वारोप गेले तरी सत्यपाल मलिक जे बोलतील ते खरेच असते असाच त्यांचा लौकिक होता. या लौकिकाला जागूनच प्रकृती बरी नसतानाही ते जनतेची लढाई लढत होते. त्यासोबतच त्यांच्या खुलेआम बोलण्याचे कारण म्हणजे, ज्याला कर नाही त्याला डर कशाला हे होते. आजकाल कणाहीन माणसांचा जमाना आहे, त्यात मलिक यांच्यासारखे कण असलेले योद्धे सुद्धा आहेत. ते लोकशाही जपण्याचे काम अत्यंत वेगळ्या पद्धतीने करीत आहेत, हे दिसून आल्यावर आपोआपच त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण होत होती. आताच्या जमान्यामध्ये हाताच्या बोटावर मोजण्या इतकी प्रामाणिक माणसे दिसतात. बाकी सारे काही कणाहीन आहे हेच तर खरे या कालखंडातील वैषम्य आहे. आज सत्यपाल मलिक यांचा नश्वर आत्मा ईहलोकांतून परलोकात गेला. त्यांनी आपल्या जीवनात जे जे पटले त्याचा स्वीकार केला, जे जे पटले नाही त्याचा तिरस्कार केला आणि शक्य तितक्या ठिकाणी न पटणाऱ्या गोष्टींचा मनापासून धिक्कार केला. अशी वाटचाल करीत त्यांनी आपले जीवन खऱ्या अर्थाने जनसामान्यांसाठी जगून यशस्वी केले. आज त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्यातील सत्यतावादी आणि सर्व समावेशक विचार असलेल्या त्यांच्या गुणांची सहज आठवण येते. सर्वसामान्य माणसांचा नेता म्हणून अतिशय चांगली कामगिरी बजावलेल्या सत्यपाल मलिक यांना आमची भावपूर्ण आदरांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### उत्तराखंडमध्ये ढगफुटीनंतर महाप्रलय

# अख्खे गाव गेले वाहून

**४** जणांचा मृत्यू
**५०** नागरिक बेपत्ता
मोठी वित्त हानी



■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ५ :**
उत्तराखंडमधील धराली येथे ढगफुटीमुळे खीर गंगा गाव वाहून गेले आहे. मंगळवारी दुपारी १.४५ वाजता ही घटना घडली. या घटनेचे अनेक व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. त्यात असे दिसून येते की डोंगरावरून पावसाचे पाणी आणि ढिगारा येऊन ३४ सेकंदात संपूर्ण गाव वाहून गेले.

उत्तरकाशीचे डीएम प्रशांत आर्य म्हणाले की, आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. ५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.
धराली गाव डेहराडूनपासून २१८ किमी अंतरावर आहे. घटनेचे अनेक व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. लष्करासह एसडीआरएफ, एनडीआरएफच्या बचाव पथकेही घटनास्थळी पोहोचली आहेत.

पूर गावाकडे येताच लोक ओरडू लागले. अनेक हॉटेलमध्ये पाणी आणि ढिगारा शिरला आहे. धराली बाजारपेठ पूर्णपणे उद्धवस्त झाली आहे. अनेक हॉटेल आणि दुकाने कोसळली आहेत. गेल्या २ दिवसांपासून येथे मुसळधार पाऊस पडत आहे. मुख्यमंत्री धामी म्हणाले की, आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत.

मान्सूनच्या पावसामुळे उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुंगेर, बक्सर, पूर्णिया, भोजपूर, पटना यासह बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शेकडो गावे पाण्याखाली गेली आहेत.

बिहारमधील पूर्णियामध्ये ३८ वर्षांनंतर विक्रमी पाऊस पडला. रविवार ते सोमवार या काळात येथे २७०.६ मिमी पाऊस पडला. यापूर्वी १९८७ मध्ये २९४.९ मिमी पाऊस पडला होता.

उत्तर प्रदेशात, प्रयागराज, वाराणसीसह १७ जिल्ह्यांमधील ४०२ गावे पुराच्या विळख्यात सापडली आहेत. आतापर्यंत पावसामुळे ३४३ घरे कोसळली आहेत. गेल्या २४ तासांत पूर-पावसाशी संबंधित अपघातांमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला आहे. जौनपूर, चंदौली, सुलतानपूर, कानपूर, पिलीभीत भागात पावसाचे कोसळधार सुरूच आहे.

### महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि

# नाविन्यता धोरण जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ जाहीर करण्यात आले आहे.

मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. इतकेच नाही तर वाढवण बंदर ते समृध्दी महामार्ग यांना जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला देखील मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

या बरोबरच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर करण्यासाठी सुधारित धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे महामंडळाचे उत्पन्न वाढीसाठी मदत होणार आहे. महामंडळाच्या माध्यमातून पेट्रोल पंप चालवण्याचा निर्णय मंत्र्यांनी घेतला होता. त्याच सोबत आता या निर्णयामुळे महामंडळ तोट्यातून बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**: मंत्रिमंडळाचे निर्णय :**

- राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरणास मंजुरी. (महसूल विभाग)
- नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १ हजार १२४ कामगारांना ५० कोटींचे सानुग्रह अनुदान मिळणार. सुतगिरणीच्या जमीन विक्रीतून निधीची तरतूद. (वस्त्रोद्योग विभाग )
- जळगांव जिल्ह्यातील मौजे पाचोरा येथील भुखंडावरील क्रींडागणाचे आरक्षण वगळून, त्याचा रहिवास क्षेत्रात समावेश करण्यास मान्यता. (नगरविकास विभाग)
- कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी सस्थांच्या अनुदानात वाढ, अनुदान २ हजारांवरून ६ हजार करण्यास मान्यता. (सार्वजनिक आरोग्य विभाग).

### आता सदनिकेच्या आकारानुसार द्यावे लागणार देखभाल शुल्क

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**

मुंबई हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी एका प्रकरणात सुनावणी करताना फ्लॅटच्या आकारानुसार मेंटेनन्स शुल्क आकारण्याचा महत्वपूर्ण निर्वाळा दिला आहे.

कोर्टाने महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप अॅक्ट - १९७० नुसार हा निवाळा दिला आहे. सद्यस्थितीत विविध निवासी संकुले व सोसायट्यांत फ्लॅट धारकांना समान देखभाल शुल्क आकारले जाते. पण आता कोर्टाच्या आदेशानुसार हे शुल्क फ्लॅटच्या आकारानुसार द्यावे लागणार आहे.
पुण्यातील एका निवासी संकुलातील वाद थेट हायकोर्टापर्यंत पोहोचला होता. या निवासी संकुलात ११ इमारतींचा समावेश होता. त्यात ३५६ हून अधिक फ्लॅटधारक आहेत. यासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी करताना हायकोर्टाने हा दिलासापूर्ण निर्वाळा दिला आहे.

### जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल

# सत्यपाल मलिक यांचे निधन



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :**
जम्मू - काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे मंगळवारी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. दुपारी १:१२ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते बऱ्याच काळापासून मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त होते. ११ मे रोजी त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

सत्यपाल २३ ऑगस्ट २०१८ ते ३० ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल होते. त्यांच्या कार्यकाळातच आजच्याच दिवशी, ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० रद्द करण्यात आले.

सत्यपाल यांचा जन्म २४ जुलै १९४६ रोजी झाला. ते २०१८ ते २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीरचे १० वे आणि शेवटचे राज्यपाल होते. याव्यतिरिक्त, त्यांनी गोवा आणि मेघालयाचे राज्यपाल म्हणूनही काम पाहिले. ते १९७४-७७ मध्ये उत्तर प्रदेश विधानसभेचे सदस्य होते. ते १९८०-८६ आणि १९८६-८९ मध्ये राज्यसभेचे आणि १९८९-९१ मध्ये नवव्या लोकसभेचे सदस्य होते. ते बिहारचे राज्यपाल देखील होते.

२२ मे रोजी, सीबीआयने जम्मू आणि काश्मीरमधील किरू जलविद्युत प्रकल्पाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात सत्यपाल मलिकसह ५ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते.

# उद्धव ठाकरे अॅक्शन मोडवर



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
महाराष्ट्रात आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. उद्धव ठाकरे यांनी आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुंबई आणि एमएमआरएच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

मनसेसोबतच्या युतीचा निर्णय पक्ष घेईल, तुम्ही सर्वच जागांसाठी तयारीला लागा, असे सांगत ठाकरे यांनी आजच्या बैठकीत ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी, वसई-विरार या ७ पालिकांच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी संजय राऊत यांनीही सूचना दिल्या.

## शायना एनसी शिंदेसेनेच्या प्रवक्त्या



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्या शायना एनसी यांची पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे प्रमुख असलेले एकनाथ शिंदे यांनी ही नियुक्ती केली आहे.

यापूर्वी भाजपमध्ये असलेल्या शायना एनसी यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महानगरातील मुंबादेवी मतदारसंघातून निवडणूक लढवली पण त्यांचा पराभव झाला होता.

# 'स्थानिक'चा बार दिवाळीनंतरच

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक दिवाळीनंतर म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

राज्य निवडणूक आयुक्तांचे सूतोवाच

विशेष म्हणजे या निवडणुकीत ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे विरोधी पक्षांनी यापूर्वी अनेकदा ईव्हीएम व व्हीव्हीपॅटमधील मतांची जुळवणी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आयोगाच्या व्हीव्हीपॅट न वापरण्याच्या निर्णयावर मोठा वाद होण्याची शक्यता आहे.

वाघमारे यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाने ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिलेत. त्यानुसार, मनपा, जिल्हा परिषद व नगपालिका अशा सर्वच निवडणुकांचा टप्प्याटप्याने कार्यक्रम आखण्यात येणार आहे.

# यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
लाडकी बहीण योजनेचा आनंदाचा शिधा योजनेला फटका. यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नसल्याची माहिती राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही, असे भुजबळ यांनी स्पष्टच सांगितले आहे.

आनंदाचा शिधा या योजनेतून राज्यातील गरिबांना सणासुदीच्या काळात केवळ १०० रुपायांमध्ये चार वस्तू योजनेच्या माध्यमातून मिळत होत्या. परंतु, आता लाडकी बहीण योजनेमुळे गोरगरिबांना सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा मिळणार नाही.

राज्यातील तिजोरीतील एकदम ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा थोडा होत असल्याची कबुली छगन भुजबळ यांनी दिली आहे.

लाडकी बहीण योजनेचा फटका




भुजबळ म्हणाले, आनंदाचा शिधा द्यायचा असेल तर त्यासाठी दोन ते तीन महिने आधी टेंडर काढावे लागते. आता तरी हे शक्य नाही. वर्षाला शिवभोजन थाळी साठी १४० कोटी रुपये तर आनंदचा शिधा साठी ५५० कोटी रुपये लागत होते.

आनंदाचा शिधा या योजनेतून सणासुदींच्या निमित्ताने राज्यातील रेशनकार्ड धारकांना फक्त १०० रुपयात काही जीवनावश्यक वस्तू देण्यात येत होत्या. त्यामध्ये एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चना डाळ, एक लीटर पामतेल देण्यात येत होते. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ही योजना सुरू करण्यात आली होती. लाडकी बहिण योजनेमुळे सरकारला अशा योजना गुंडाळाव्या लागत असल्याचे दिसते.

स्वच्छ सर्वेक्षण 2025

नगर परिषद, अकोट जि. अकोला

ULB CODE 802674

माझी वसुंधरा
Majhi Vasundhara

पर्यावरण पुरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२५

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत अकोट शहरातील सार्वजनिक गणेशउत्सव मंडळासाठी पर्यावरण पुरक सार्वजनिक गणेशउत्सव स्पर्धा सन २०२५ आयोजित करण्यात येत आहे.

प्रस्तावित उपक्रमाची रुपरेषा व गुणांकन

| अ.क्र. | तपशील | गुण |
| --- | --- | --- |
| १ | पर्यारण पुरक गणेश मूर्तीची प्रतिस्थापना व आरास (प्लॅस्टिक/थर्माकॉलचा वापर न करता, फटाके न वापरता.) | २५ गुण |
| २ | टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ १) प्रतिकृती / वस्तु तयार करणे. | २० गुण |
| ३ | वृक्षारोपण व संवर्धन करणे (२० वक्ष लागवड) | २० गुण |
| ४ | इलेक्ट्रिक वाहनचा वापराबाबत जनजागृती करणे किंवा सौर ऊर्जा वापरकरणे बाबत जनजागृती करणे. | १५ गुण |
| ५ | हरित शपथ अ) सदस्य व नागरिकांनी शासनाकडील https://majhivasundhara.in/en/lets-pledgu या वेबसाइटवर एकूण 500 E-pledga घेऊन त्याचे प्रमापत्र सोबत जोडावे. | ३० गुण |
| ६ | स्वच्छ भारत अंतर्गत १) प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम यावर नागरिकांना संदेश देणारा देखावा. २) कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती संदेश देणारा देखावा. (कोणतेही एक) | ३० गुण |
| ७ | जनजागृती उपक्रम - अ) स्वच्छ भारत विषयक पथनाट्य करणे ब) चितकला व रांगोळी स्पर्धा (विषय - पर्यावरण व स्वच्छता) | ३० गुण |
| ८ | गणेश उत्सव मंडळणे 200 Seed Ball तयार करणे व जमिनीत पेरण्या ऐवजी मोकळ्या जागे मध्ये फेकणे. [illegible] | ३० गुण |

स्पर्धेतील बक्षिसे खालीलप्रमाणे

| परितोषिक | बक्षिसे |
| --- | --- |
| प्रथम क्रमांक | रु.५१,०००/- व ट्रॉफी |
| व्दितीय क्रमांक | रु.३१,०००/- व ट्रॉफी |
| तृतीय क्रमांक | रु.२१,०००/- व ट्रॉफी |

(प्रवेश शुल्क मोफत)

... संपर्क ...
१) श्रीमती प्राजक्ता पांडे, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता, न.प.अकोट मो.8788371574
२) श्री अक्षय फडतरे, स्वच्छता निरीक्षक न.प.अकोट मो.9011956562
३) श्री अनिकेत फुके, न.प.अकोट मो.9307867082

१००००+ लाखांची बक्षिसे

* स्पर्धेचे अटी व नियम नगरपरिषद, अकोट कार्यालयात पाहावयास मिळतील.
* नगरपरिषदेच्या निर्णय अंतिम राहील.

स्वच्छ सर्वेक्षण 2025

डॉ. नरेंद्र बेंबरे
प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, अकोट
सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग.

## शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासाचे निर्णय घेणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



**मुंबई :** शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असून राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरणे राबविणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. कृषिमंत्री श्री.भरणे यांनी मंत्रालयातून कामकाजास सुरवात केली, त्यावेळी ते बोलत होते. कृषिमंत्री भरणे म्हणाले की, मी स्वतः शेतकऱ्याचा मुलगा असून शेती व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय हाच माझा प्राधान्याचा विषय असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्राचा विकासासाठी निर्णय घेण्यात येतील. कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात व्यापार वृद्धीच्या संधी : जयकुमार रावल



**मुंबई:** महात्मा गांधी यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यापासून महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ऐतिहासिक संबंध आहेत. हे संबंध व्यापारवृद्धीच्या माध्यमातून अधिक दृढ करण्यास महाराष्ट्र उत्सुक असून खनिज उत्खनन क्षेत्रात व्यापारवृद्धीच्या मोठ्या संधी आहेत, असे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. दक्षिण आफ्रिकेचे महावाणिज्यदूत गिडीयन लबाने यांनी आज महाराष्ट्राचे राजशिष्टाचार मंत्री श्री.रावल यांची सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोघांनी व्यापारवृद्धीच्या क्षेत्रांबाबत औपचारिक चर्चा करण्यात आली. .रावल म्हणाले, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही देश विकासाच्या वाटेवर आहेत. महाराष्ट्र हे भारताचे पॉवर हाऊस आहे. येथे पर्यटनाबरोबरच विविध क्षेत्रात विकासाच्या संधी आहेत. खनिज उत्खनन, विविध उत्पादने आदी क्षेत्रे निश्चित करुन महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान व्यापार वृद्धी शक्य आहे. याच माध्यमातून दोघांमधील ऐतिहासिक संबंध अधिक वृद्धींगत होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राला दक्षिण आफ्रिकेविषयी नेहमीच आत्मियता राहिली असल्याचे यावेळी मंत्री रावल यांनी सांगितले.

## प्रत्येक बारमध्ये नाचगाणे चालत नाही

### भरत गोगावलेंचे मनसेच्या तोडफोडीवर भाष्य



**मुंबई :** राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी बारमध्ये तोडफोड करण्याच्या मुद्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेवर शरसंधान साधले आहे. राज्यात सर्वत्र बार आहेत. पण सगळीकडेच हिडीस - फिडीस गोष्टी चालत नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. शेतकरी कामगार पक्षाचा 78 वा वर्धापन दिन नुकतीच पनवेलमध्ये साजरा झाला. त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नवी मुंबई व पनवेलसह रायगड जिल्ह्यातील वाढत्या डान्स बारचा मुद्दा उपस्थित केला. रायगड हा छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेला जिल्हा. महाराजांचा राज्यकारभार ज्या किल्ल्यावरून चालला, त्या किल्ल्यावरून या जिल्ह्याला रायगड हे नाव पडले. असे असताना आता रायगडची ओळख डान्सबारचा जिल्हा म्हणून होत आहे, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानानंतर लगेचच मनसैनिकांनी जुन्या मुंबई - पुणे महामार्गावरील नाईट रायडर नामक बारची तोडफोड केली होती.

## हिंदूंची घरे मुस्लिमांना देऊन लोकसंख्या बदलण्याचा डाव : संजय निरुपम



**मुंबई :** जोगेश्वरी येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांमध्ये हिंदूंची घरे पद्धतशीरपणे मुस्लिमांना विकली जात आहेत. यामागे मुंबईची लोकसंख्या बदलण्याचा मोठा कट असल्याचा आरोप करत शिवसेनेचे उपनेते संजय निरुपम यांनी मुंबईत हाउसिंग जिहादचा सुरू असल्याचा दावा केला आहे. जोगेश्वरीतील पॅराडाइज झोन प्रकल्पात मूळ ४४ घरांची संख्या ९५ पर्यंत वाढली. यातील ५१ अतिरिक्त घरे मुस्लिम व्यक्तींना देण्यात आली. त्यांनी अब्दुल गनी किताबुल्लाह नावाच्या बिल्डरच्या मुलांवर ३० घरे वाटून घेतल्याचा आरोपही केला. या प्रकारामुळे संपूर्ण वस्ती मुस्लिमांची झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे, श्री शंकर झोपडपट्टी योजनेतही अशीच घटना घडली असून ६७ पैकी केवळ ६ मुस्लिम कुटुंबे असतानाही पुनर्विकासानंतर १२३ अतिरिक्त घरे मुस्लिमांना विकली गेली आहेत. या जागेवर असलेले गणेश मंदिर आणि देवीचा मंडप हटवून आता मदरसे दिसत आहेत. या प्रकरणाची एसआरएने चौकशी केली असली तरी त्यांनी हाउसिंग जिहादची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान, आता यावरून मोठे राजकारण होण्याची शक्यता आहे.

# राज्य शासनही सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

नांदणी मठातील (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, अशी जन भावना आहे. ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात हत्तीणीला परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल, असे सांगून याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नांदणी मठ (ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर) येथील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

नांदणी मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गेल्या 34 वर्षांपासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जन भावना आहे. ही जन भावना लक्षात घेऊन राज्य शासन पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य शासनाचाही समावेश करावा. तसेच वन विभागाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल. यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रमाणे व उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल. हत्तीणीची निगा राखण्यासाठी डॉक्टरसह राज्य शासन एक पथक तयार करून आवश्यक ती सर्व मदत करेल. आवश्यक वाटल्यास रेस्क्यू सेंटरसारखी व्यवस्थाही करण्यात येईल व त्या प्रमाणे सुविधा देण्यात येतील आदी बाबींचा समावेश करून या बाबी तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयास स्वतंत्र समिती नेमण्याची विनंतीही राज्य शासनामार्फत या याचिकेमध्ये करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. तसेच या प्रकरणात नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्रातील जे हत्ती बाहेर नेण्यात आले, अशा सर्व हत्तींची माहिती वन विभागाने गोळा करावी, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा, अशी भूमिका मांडली. यावेळी खासदार धैर्यशील माने, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, विश्वजीत कदम, सतेज पाटील, अशोक माने, सदाभाऊ खोत, राहुल आवाडे, अमल महाडिक, माजी खासदार राजू शेट्टी, माजी आमदार प्रकाश आवाडे, नांदणी मठाचे पूज्य स्वस्तीश्री जिनसेन महास्वामीजी, जैन अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास राव, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे आदीसह जैन स्वामी व स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## अवैध मासेमारीवर ड्रोनचा धडाका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

देशभरात सागरी मत्स्योत्पादनात घट होत असताना, महाराष्ट्राने मात्र या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. २०२४ मध्ये राज्याचं सागरी मत्स्योत्पादन तब्बल ४७ टक्क्यांनी वाढलं असून, यामागे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या क्रांतिकारी निर्णयांचा मोलाचा वाटा असल्याचं स्पष्ट झालं आहे.

सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, महाराष्ट्रात सागरी मासेमारीमध्ये मोठी वाढ झाली असून, बांगडा, तारळी, पेडवे आणि मांदेली यांसारख्या माशांच्या उत्पादनात मोठी भर पडली आहे. मंत्री नितेश राणे यांनी डिसेंबर २०२४ मध्ये मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यात अवैध मासेमारीवर कठोर कारवाई सुरू केली. महाराष्ट्राच्या किनाऱ्यांवर ड्रोन कॅमेरे बसवून परराज्यातून होणाऱ्या बेकायदेशीर मासेमारीवर लक्ष ठेवण्यात आलं. एलईडी मासेमारीसारख्या तंत्राचा गैरवापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली. या सर्व उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम राज्याच्या उत्पादनावर दिसून आला आहे. विशेष म्हणजे, देशाचं एकूण सागरी मत्स्योत्पादन २०२३ मध्ये ३५.३० लाख टनांवरून २०२४ मध्ये ३४.७० लाख टनांवर आलं, म्हणजेच २ टक्क्यांनी घट झाली. २०२४ मध्ये सर्वाधिक पकड झालेल्या माशांमध्ये बांगडा (२.९३ लाख टन) व तारळी (२.४१ लाख टन) आघाडीवर आहेत. याशिवाय, पेडवे आणि मांदेली या स्थानिक प्रजातींच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे.

## कल्याणमधील पोलिस ठाण्यात गोळीबार प्रकरण

### माजी आमदार गणपत गायकवाडांसह तिघांचा जामीन अर्ज कोर्टाने फेटाळला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

कल्याण पूर्वचे तत्कालीन आमदार गणपत गायकवाड यांनी उल्हासनगरच्या हिल लाईन पोलिस ठाण्यात शिंदे सेनेचे नेते महेश गायकवाड यांच्यावर केलेल्या गोळीबार प्रकरणात एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. या प्रकरणात माजी आमदार गणपत गायकवाडांसह तिघांचा जामीन अर्ज कोटाने फेटाळला आहे. त्यामुळे या प्रकरणाची पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे.

या गोळीबाराच्या घटनेनंतर गणपत गायकवाड यांना अटक करण्यात आली होती. सध्या ते तळोजा कारागृहात आहेत. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने त्यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी दिली होता. महेश गायकवाड यांनी त्यांच्याविरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवली, मात्र सुलभा गायकवाड यांनी विजय मिळवत कल्याण पूर्व मधील गायकवाड कुटुंबाची सत्ता कायम ठेवली. या प्रकरणी पुढील कायदेशीर लढाईत काय घडते, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

या प्रकरणात पुरवणी चार्जशीट मधून आमदार गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड याचे नाव वगळण्यात आले होते. वैभव गायकवाड विरोधात कोणतेही ठोस पुरावे आढळून आले नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले होते. ही घटना उल्हास नगर हिल लाईन पोलिस ठाण्यातील वरिष्ठ निरीक्षकांच्या केबिनमध्ये घडली होती. तत्कालीन आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. या प्रकरणात गणपत गायकवाड अद्याप तुरुंगात असून, त्यांच्यासह काही इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. सुरुवातीला या प्रकरणात गणपत गायकवाड यांचे पुत्र वैभव गायकवाड यांचेही नाव समाविष्ट करण्यात आले होते.

शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड आणि आमदार गणपत गायकवाड यांच्यात काही गुंठे जमिनीवरुन वाद सुरू होता. हे प्रकरण 2 फेब्रुवारी रोजी उल्हासनगरच्या हिललाईन पोलिस ठाण्यात पोहोचले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी दोघे पोलिस ठाण्यात आले होते. गणपत गायकवाड यांनी रागाच्या भरात महेश गायकवाड यांच्यावर पोलिस ठाण्यातच गोळीबार केला होता. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. या गोळीबार प्रकरणी आमदार गणपत गायकवाड सध्या तुरुंगात आहेत.

महेश गायकवाड आणि गणपत गायकवाड यांच्यामध्ये राजकीय शीतयुद्ध सुरु होते. घटनेच्या काही महिन्यांपूर्वी उल्हासनगर हद्दीतील द्वारली गावातील जमिनीवरुन दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता. त्या जागेवर बांधण्यात आलेली भिंत शिंदे गटाकडून पाडण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकरण पोलिस स्टेशनमध्ये गेले.

## संविधान हटवणे हाच भाजप, मनुवादी विचारांचा खरा अजेंडा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :



संविधान हटवणे हाच भाजप व मनुवादी विचारांचा खरा अजेडा असल्याची जहाल टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी भाजप व शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्यावर निशाणा साधताना केली. संतानी दिलेला समता, मानवता व सामाजिक न्यायाचा तथा शिव - फुले - शाहू - आंबेडकरांचा विचार संपवणे कुणालाही शक्य नसल्याचेही ते यावेळी जोर देत म्हणाले.

संभाजी भिडे यांनी आपल्या नाशिक दौऱ्यात लाल किल्यावर भगवा झेंडा फडकवण्याचा संकल्प व्यक्त केला होता. आपण स्वातंत्र्यावेळी तिरंगा झेडा स्वीकारला. आपण तिरंगा व संविधान मानलेच पाहिजे. पण भगवा ध्वज हा हजारो वर्षांपासून देशाचे प्रतीक आहे. त्यामुळे देव, देश व धमार्साठी आपण कटिबद्ध असले पाहिजे. आम्ही 15 ऑगस्ट रोजी तिरंगा फडकावूच, पण दिल्लीच्या लाल किल्ल्यावर भगवा फकडवण्यासाठीही सतत काम करत राहू, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानातून त्यांचा मूळ हेतू हा तिरंग्याचा जागी भगव्याची प्रतिष्ठापणा करण्याचा असल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी उपरोक्त टीका केली आहे. रोहित पवार मंगळवारी सकाळी एका ट्विटद्वारे म्हणाले की, संविधान हटवणं हाच भाजपचा आणि मनुवादी विचारांचा खरा अजेंडा राहिला असून वादग्रस्त तथाकथित गुरुजींची पात्रे त्यासाठीच उभी केली गेली आहेत. तिरंगा झेंडा, संविधानाची मुलभूत तत्वे यावर या वादग्रस्त लोकांकडून जाणीवपूर्वक वादग्रस्त वक्तव्ये करवून घेतली जातात आणि जनमताची प्रतिक्रिया जाणून घेण्याचं काम करून घेतलं जाते.

## पुण्यात प्रदेश काँग्रेसचे दोन दिवस आत्मपरीक्षण

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ५ :

राज्यात काँग्रेसची पडझड होत असताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी २६४ नेत्यांची जम्बो प्रदेश कार्यकारिणी जाहीर केल्यानंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची व्यूहरचना पुण्यात आखली जाणार आहे. पुण्यात ११ आणि १२ ऑगस्ट रोजी प्रदेश कार्यकारिणीची बैठक होणार असून, त्या बैठकीत आगामी निवडणुकीच्या रणनीतीबरोबरच पक्षाला उर्जितावस्था आणण्यासाठी पराभवाचे आत्मपरीक्षण आणि भविष्यातील गळती रोखण्यासाठी आत्मचिंतन केले जाणार आहे.

## गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी आणि नरिमन पॉईंट येथे पर्यटन सुरक्षा दल नेमणार : शंभूराज देसाई



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

पर्यटन स्थळांच्या ठिकाणी सुरक्षा दल हा पर्यटन विभागाकडून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. मुंबईतील पर्यटनस्थळावरती सुरक्षेच्या दृष्टीने गेट वे ऑफ इंडिया आणि गिरगाव चौपाटी, नरिमन पॉईंट येथे पर्यटन सुरक्षा दल नेमण्याची कार्यवाही करा, असे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

यासंदर्भात मंत्री देसाई यांच्या निवासस्थानी मेघदूत येथे बैठक झाली. बैठकीस पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पयटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक चंद्रशेखर जयस्वाल यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

देसाई म्हणाले, सध्या महाबळेश्वर येथे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटन सुरक्षा दल हा उपक्रम सुरू आहे. टप्प्या-टप्प्याने या उपक्रमाची राज्यात व्याप्ती वाढविण्यात येत आहे. मुंबईत पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देत असून पर्यटकांना सुरक्षा दिल्यास सुरक्षित पर्यटन होऊन पर्यटन वाढीला चालना मिळेल. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे हे लक्षात घेऊन गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, नरिमन पॉईंट येथे पर्यटक सुरक्षा दल नेमण्यात यावेत. राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटन सुरक्षा दलासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तातडीने कार्यवाही करावी.

## दोन अपघातांमध्ये दुचाकीवरील तीन महाविद्यालयीन तरुण जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ५ :

वांद्रे आणि जोगेश्वरी परिसरात रविवारी झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये तीन महाविद्यालयीन विद्यार्थी गंभीर जखमी झाले. जोगेश्वरी येथील अपघातात दुचाकीला रिक्षाने धडक दिली, तर वांद्रे येथील अपघातात टॅक्सीने दुचाकीला धडक दिली. धडक देणारा रिक्षाचालक फरारी असून टॅक्सीचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पहिला अपघात जोगेश्वरी (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावर झाला. राकेश जगताप (२२) रविवारी दुपारी २.३० च्या सुमारास आपल्या मित्राला भेटण्यासाठी दुचाकीवरून जोगेश्वरी रेल्वे स्थानकाकडे जात होता. त्याला भरधाव वेगा आलेल्या रिक्षाने धडक दिली. ही धडक एवढी जोरदार की त्यामुळे राकेश दुचाकीवरून फेकला गेला.

या अपघातानंतर रिक्षाचालक घटनास्थळावरून फरारी झाला. राकेशवर रुग्णालयात उपचार करण्यात आले. फरारी रिक्षाचालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सीसी टीव्ही चित्रण (फुटेज) तपासण्यास सुरुवात केली आहे.

## पुण्यात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्याने कामगाराचा मृत्यू




■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ५ :

पुण्यात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्याने एक कामगाराचा मृत्यु झाला असून इतर दोन कामगार जखमी आहेत. नांदेड सिटी परिसरात महानगरपालिका प्रकल्पासाठी उत्खनन करताना हा अपघात झाला आहे. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार पुण्याच्या नांदेड सिटी परिसरात उत्खनन करताना माती कोसळल्याने तीन कामगार मातीखाली गाडले गेले आहेत. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे तर दोन कामगारांना सुखरूप वाचवण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या जिका प्रकल्पांतर्गत नदी सुधारणा प्रकल्पासाठी खोदकाम सुरू असताना नांदेड सिटी जवळ रस्त्याच्या कडेला हा अपघात घडला. मातीचा ढीग कामगारांच्या अंगावर पडला आणि कामगार त्यात अडकले गेले. अग्निशमन दल, पोलिस आणि पीएमआरडीएच्या पथकाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढले.

## महाराष्ट्र-कर्नाटक पाणी वादात अखेर केंद्राचा हस्तक्षेप

### अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा फेरविचार होणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :




कर्नाटकातील अलमट्टी धरण आणि हिप्परगी बॅरेजच्या बांधकामात आणि प्रस्तावित उंची वाढीतील कथित अनियमिततेची केंद्राने अधिकृत चौकशी सुरू केली आहे. या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कर्नाटकच्या एकतर्फी कृतींमुळे संभाव्य पूर धोका आणि पाणी व्यवस्थापन आव्हाने अधोरेखित केले होते. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्र दिले होते. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

या बाबत झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत महाराष्ट्र-कर्नाटक पाणी वादात एक मोठी अपडेट समोर आली आहे. केंद्र आता थेट सहभागी असल्याने, राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण (एनडीएसए) च्या निष्कर्षांवर आणि कर्नाटकचे प्रस्ताव आंतरराज्यीय जल व्यवस्थापन नियम आणि पर्यावरणीय संतुलनाचे पालन करतात का? यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील म्हणाले की, एनडीएसएकडून या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ बैठकीत उपस्थित होते आणि नंतर त्यांनी केंद्र सरकारच्या प्रतिसादाबद्दल माध्यमांना माहिती दिली.

"केंद्राने आमच्या चिंतांची गंभीर दखल घेतली आहे. राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण अलमट्टी आणि हिप्परगी प्रकल्पांमधील बांधकाम आणि कामकाजातील विसंगतींची तपासणी करेल. कोल्हापूर, सांगली आणि कृष्णा नदीच्या संपूर्ण खालच्या भागातील लोकांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे," असे देखील विखे पाटील म्हणाले आहेत.

अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या प्रश्नासंदर्भात महाराष्ट्र राज्याची भूमिका केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्यासमोर शिष्टमंडळाच्या माध्यमातून मांडली. धरणाची उंची वाढविल्यास कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील नागरिकांचे तसेच शेती क्षेत्राचे पुराच्या पाण्यामुळे होत असलेल्या नुकसानीचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले.

या शिष्टमंडळात मंत्री प्रकाश आबीटकर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार शाहू छत्रपती, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, खासदार विशाल पाटील, माजी मंत्री, आमदार सदाभाऊ खोत, आमदार सतेज पाटील, आमदार सुरेश खाडे, आमदार विश्वजीत कदम, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार सत्यजीत देशमुख, आमदार राहुल आवाडे, आमदार अरूण लाड, आमदार अशोक माने आदींचा समावेश होता.

## परवानगीशिवाय बैलगाडी शर्यत

### आयोजकांसह १४ जणांविरुद्ध गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ५ :

पुणे येथील गुजर निंबाळकरवाडी येथे पोलिस आणि प्रशासनाची परवानगी न घेता बैलगाडी शर्यत आयोजित केल्याप्रकरणी आयोजकांसह १४ हून अधिक जणांविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये आदित्य सनस, ऋषभ बालचंद्र धावडे, हेमंत मुकुंद बेंद्रे, रोहीत भारत रणमळे, आदित्य मोहन शिंदे, ओमकार इंगवले, दिगंबर होळवले, प्रथमेश गातळे, अनिकेत बगडे, सादिक शिंदे, सुरज मिंडे, लखन विक्रम पवार यांचा समावेश आहे. पोलिस अमंलदार सचीन तात्याराव पवार (३९) यांनी याबाबत तक्रार नोंदवली आहे.

३ ऑगस्ट रोजी दुपारी घडलेल्या या प्रकरणात शर्यतीसाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिकारी, ॲम्बुलन्स, पोलिस बंदोबस्त यांची व्यवस्था करण्यात आली नव्हती. तसेच शर्यतीच्या ठिकाणी कोणतेही बॅरेकेटिंग नव्हते. सुरक्षिततेच्या कोणत्याही उपाययोजना न करता बैलगाडी शर्यत भरवून तेथे जमलेल्या लोकांच्या जीवाला धोका निर्माण केला.

पोलिसांनी आयोजकांना व बैलगाडा मालकांना शर्यत थांबविण्याचे तोंडी आदेश देऊनही त्यांनी शर्यत चालू ठेवली. यावेळी बैलांना क्रूरपणे चाबकाचे फटके देण्यात आले.

दरम्यान, येरवडा येथील शांतीनगरमध्ये नळ दुरुस्त करताना पाणी दारात गेल्याने लोखंडी हत्याराने व रॉडने मारहाण करून शिवीगाळ करणाऱ्या चौघांविरुद्ध विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अब्दुल हमीद शेख (५०), सीतारा शेख (३२), शोयब शेख (२४) आणि आसिफ शेख (२४) यांच्याविरुद्ध अशिश रामअवतार गुप्ता (२६) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांसाठी देशाबाहेर अभ्यास दौरे योजना

**अकोला :** राज्यातील शेतकऱ्यांना विदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख प्रत्यक्ष करून देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यासदौरे ही योजना राबविण्यात येत आहे.योजनेंतर्गत इच्छुक शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयास अर्ज सादर करावयाचे असून त्यानुसार जिल्हास्तरावर वितरीत लक्षांकानुसार सोडत प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांची निवड अंतिम करण्यात येणार आहे.जिल्हास्तरावर शेतकऱ्यांची निवड झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत संबंधित शेतकऱ्यांना निवड झालेबाबत अवगत करण्यात येईल. सदर शेतकरी निवड झाल्यानंतर कृषी आयुक्तालयामार्फत दौऱ्यांचे आयोजन केले जाईल. या योजनेत प्रति शेतकरी अनुदान हे एकूण दौरा खर्चाच्या ५०% किंवा जास्तीजास्त रु. १.०० लाख इतके देय आहे. त्यानुसार निवड झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागामार्फत सूचना प्राप्त झालेनंतरच शासन अनुदानाची रक्कम वगळून उर्वरित रक्कम दौरा खर्च म्हणून भरणा करावयाची आहे.याबाबतचा तपशील प्रत्यक्ष दौरा आयोजित करण्यापूर्वी संबंधित निवड झालेल्या शेतकऱ्यांना जिल्हा कार्यालयांद्वारे देण्यात येईल याची नोंद घ्यावी. तोपर्यंत शेतकऱ्यांनी कोणतीही रक्कम कोणत्याही व्यक्तीस/संस्थेस/प्रवासी कंपनीस अदा करण्याची आवश्यकता नाही.

# सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव स्पर्धेत जिल्ह्यातील अधिकाधिक मंडळांनी सहभागी व्हाव

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

**सांस्कृतिक कार्य विभागातर्फे, सन २०२५ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेसाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

जिल्ह्यातील मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे समितीच्या अध्यक्षपदी असून, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन बोबडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी प्रादेशिक अधिकारी संजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, पोलीस उपअधिक्षक आनंद म हाजन हे सदस्य आणि जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर हे सदस्य सचिव आहेत.स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या Mahotsav.lda@gmail.com या ईमेलवर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज गणेश चतुर्दशीच्या एका दिवसापूर्वीपर्यंत पाठवावेत, असे आवाहन समितीने केले आहे. राज्य समितीकडे जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ आणि अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशींमधून गुणांकन आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड केली जाणार आहे. तर उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना सहभागी होता येईल. गुणांकनात गायन, वादन, नृत्य, नाट्य, लोककला, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला, माहितीपट/चित्रपट आदींसाठी प्रत्येकी २ नुसार एकूण २० गुण आहेत.संस्कृतीचे जतनअंतर्गत संस्कृती संवर्धन, पारंपरिक भांडी, नाणी, शस्त्र आदी प्रदर्शन, वाङमयीन उपक्रम, लुप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन आदींसाठी प्रत्येकी २ असे एकूण १० गुण आहेत.राज्यातील गडकिल्ले, तसेच राष्ट्रीय, राज्य स्मारक यांच्या जतन, संवर्धनासाठी प्रत्येकी ५ नुसार एकूण १० गुण आहेत.सामाजिक उपक्रमात महिला उपक्रम, पर्यावरण रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार, व्यसनमुक्ती, ज्येष्ठ नागरिक उपक्रम, शैक्षणिक, कृषी उपक्रम, वंचित घटकांसाठी उपक्रम आदींसाठी प्रत्येकी २ याप्रमाणे २५ गुण आहेत. त्यातआरोग्य सेवा, ग्रंथालय, वृध्दाश्रम, एखादे गाव दत्तक घेणे अशा प्रकारचे कायमस्वरूपी उपक्रम राबवणाऱ्या मंडळांना ५ गुणांचा समावेश आहे.पर्यावरणपूरक मूर्तीसाठी ५ व पर्यावरणपूरक सजावटीला ५ गुण आहेत., ध्वनीप्रदूषणरहित वातावरण असल्यास ५ गुण व पारंपरिक किंवा देशी खेळांच्या स्पर्धेसाठी १० गुण आहेत. गणेशभक्तांसाठी पेयजल, प्रसाधनगृह, प्रथमोपचार, वाहतूकीत अडथळा येणार नाही असे आयोजन, स्वच्छता यासाठी प्रत्येकी २ असे एकूण १० गुण आहेत.

# कावड यात्रा अकोल्यात बनली लोकोत्सव

## आ. रणधीर सावरकर यांचे प्रतिपादन

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :



श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात कावड यात्रेने एक नवा भक्तीमय उत्सवाचा रंग धारण केला असून, गावपातळीपासून ते महानगरापर्यंत धर्म, श्रद्धा, एकता आणि मानवतेचा संगम घडवणारा हा लोकोत्सव बनला आहे, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस व आमदार रणधीर सावरकर यांनी केले. त्यांनी बोरगाव मंजू येथे कावड यात्रेच्या पूजन सोहळ्याला उपस्थित राहून शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ते म्हणाले की, कावड यात्रेचा उत्सव हा जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन समाजामध्ये एकात्मता आणि सद्भावना निर्माण करणारा आहे.

# राज्य मुष्टियुद्ध स्पर्धेत अकोला जिल्ह्याला २३ पदके

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :



जळगाव येथे आयोजित महाराष्ट्र राज्य मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत जिल्ह्याने अकोला जिल्हा क्रीडा प्रबोधिनी व अकोला शहर संघाच्या मुष्टियोद्ध्यांनी दमदार कामगिरी करत २३ पदके पटकावली. त्यात ८ सुवर्ण, ७ रजत व १० कांस्य पदकांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी सर्व खेळाडूंचा गौरव करून अभिनंदन केले आहे. ज्यु. मुले, मुली वयोगटात क्रीडापीठ व अकोला शहर संघामधून ३० ते ३३ कि. वजनगटात आदित्य सोनकांबळे, ३५ ते ३७ कि. वजनगटात संस्कार आत्राम, ४३ ते ४६ कि. वजनगटात वेदांत पवार, ४० ते ४३ कि. वजनगटात कु. इशिका झांबरे, ७७ ते ७८ कि. वजनगटात कु. गार्गी राऊत, ५८ ते ६१ कि. वजनगटात कु. अक्षरा खंडारे व ७०+ कि. वजनगटात कु. वेदश्री गोतमारे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले.त्याचप्रमाणे, ३७ ते ४० वजनगटात प्रेशित गोगलिया, ४० ते ४३ वजनगटात जयेश कुंभार, ४९ ते ७२ वजनगटात विपुल चव्हाण यांनी रजत पदक प्राप्त केले. तसेच ३७ ते ४० कि. वजनगटात क्रिश मकोरीया, ४६ ते ४९ कि. वजनगटात बख्तीयार बहेरेवाले, ७०+ कि. वजनगटात स्वराज कांबळे व ४९ ते ७२ कि. वजनगटात कु. स्वराली वानखेडे यांनी कांस्य पदक प्राप्त केले.कॅडेट क्लास मुली वयोगटात २८ ते ३० कि. वजनगटात कु. आराध्या कापरे, ३० ते ३२ कि. वजनगटात कु. अभिज्ञा इंगळे, ३२ ते ३४ कि. वजनगटात कु. आराध्या बोरसे, ३६ ते ३८ कि. वजनगटात कु. सेलीना चव्हाण, ४८ ते ५०कि. वजनगटात कु. त्रिशा पटके यांनी कांस्य पदक प्राप्त केले. कब क्लास मुली वयोगटात क्रीडापीठ व अकोला शहर संघामधून ३६ ते ३८ कि. वजनगटात कु. निहारीका गणवीर हिने सुवर्ण पदक प्राप्त केले तसेच २२ कि. वजनगटात कु. रसिका झांबरे हिने रजत पदक प्राप्त केले तसेच २८ ते ३० कि. वजनगटात कु. अवनी ठोसर हिने कांस्य पदक प्राप्त केले.या यशाबद्दल जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे सर्व विजेत्या खेळाडूंचा सत्कार केला.

## परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी निखिल बसवराज पाटील यांनी पदभार स्विकारला

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

अकोट उपविभागाच्या पोलीस व्यवस्थेला नवे नेतृत्व लाभले आहे.सहाय्यक पोलीस अधीक्षक (एएसपी) अनमोल मित्तल यांची ठाणे ग्रामीण येथे अप्पर पोलीस अधीक्षक पदावर पदोन्नती झाल्यानंतर त्यांच्या जागी नियुक्त करण्यात आलेले परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी निखिल बसवराज पाटील यांनी अखेर सोमवारी पदभार स्वीकारला.त्यांच्या कार्यशैलीबाबतनागरिकांमध्ये विशेष उत्सुकता असून, कायदा-सुव्यवस्थेच्या अधिक दृढ अंमलबजावणीसाठी त्यांच्याकडून ठोस अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

# ऑफलाईन शिधापत्रिकांचे वितरण बंदच

## बनावट शिधापत्रिका आढळल्यास फौजदारी कारवाई

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

त्रयस्थ व्यक्तीकडून काही नागरिकांना बनावट शिधापत्रिका दिल्याची तक्रार पुरवठा कार्यालयास मिळाली आहे. प्रत्यक्षात शासनाकडून २ वर्षांपासून ई- शिधापत्रिकांचे वितरण होत आहे. ऑफलाईन शिधापत्रिका वितरण बंद आहे. त्यामुळे अनधिकृत पत्रिका देऊन नागरिकांची फसवणूक करणा-या किंवा बनावट पत्रिकांचा वापर करणा-या व्यक्तींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी दिला आहे. त्रयस्थांमार्फत मिळालेल्या बनावट शिधापत्रिकांचा वापर कार्यालयात विविध कामकाजाकरिता वापर होत असतांना निदर्शनास आले आहे. प्रत्यक्षात सर्व क्षेत्रीय कार्यालयामध्ये मागील दोन वर्षापासून शासनाचे आदेशाची अंमलबजावणी सुरू आहे. ई-शिधापत्रिका वितरण करण्यात येत आहे. प्राप्त तक्रारीनुसार अकोला जिल्ह्यातील सर्व नागरिकांना शिधापत्रिकांच्या विविध कामकाजाकरिता तालुकानिहाय पुरवठा

### ई-शिधापत्रिकांचे वितरण सुरू

शाखेमध्ये नियुक्त असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशीच संपर्क करून आपले कामकाज पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन श्री. यन्नावार यांनी केले.त्रयस्थ व्यक्तीकडून या कार्यालयातून कोणतेही काम केले जात नाही. कोणताही नागरिक त्रयस्थ व्यक्तीकडून शिधापत्रिकांचे किंवा पुरवठा संबंधीत कोणतेही कामकाज करून घेण्यासाठी कार्यालयात वावरताना किंवा आढळून आल्यास संबंधीतावर थेट फौजदारी गुन्हा नोंद करण्यात येईल. त्रयस्थ व्यक्तीकडून शिधापत्रिकांचे कोणतेही काम करून घेऊ नये, तसेच त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे देऊन स्वतःची फसवणुक होऊ नये. पुरवठा संबंधीत कामकाजाकरीता नागरीकांनी अधिकृत केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशीच कार्यालयात येऊन शिधापत्रिकांचे काम पुर्ण करून घेण्यात यावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार यांनी केले आहे.

# आस्था योग फाउंडेशनचा दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग



■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

स्थानिक आस्था फाउंडेशन व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे दि.५ ऑगस्ट २०२५ रोजी जानोरकर भवन अकोला येथे दिव्यांग जनजागृती कार्यक्रम आयोजित केला गेला . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आस्था योग फाउंडेशन अकोला चे मार्गदर्शक डॉ.चंद्रकांत अवचार , प्रमुख अतिथी म्हणून दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे , सदस्य अस्मिता मिश्रा व प्रा.नानासाहेब सपकाळ उपस्थित होते . डॉ.विशाल कोरडे यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने कार्यरत असणाऱ्या सामाजिक उपक्रमाची माहिती उपस्थितांना दिली.

दिव्यांगांच्या समस्या व रोजगार निर्मिती याबाबत साधक-बाधक चर्चा करण्यात आली. येणाऱ्या सण समारंभात दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेली विविध उत्पादने खरेदी करून त्यांना रोजगार द्यावा असे आव्हान डॉ.चंद्रकांत अवचार यांनी केले.

## खरीप हंगामात ई-पीक पाहणी १४ सप्टेंबरपर्यंत नोंदणीची मुदत

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी २०२५-२६ या वर्षासाठी खरीप हंगामाची ई - पीक पाहणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. शेतकऱ्यांना स्वतःहून १४ सप्टेंबरपर्यंत ई - पीक नोंदणी करता येणार आहे. राज्यात १ ऑगस्टपासून या वर्षासाठी खरीप हंगामाची ई-पीक पाहणी सुरू झाली आहे. या पाहणीसाठी जमाबंदी आयुक्तांकडून 'ई-पीक पाहणी डीसीएस' मोबाइल ॲप गुगल प्ले स्टोअरवर ४.०० व्हर्जनमध्ये उपलब्ध करून दिले आहे.

# पारस व अकोट फाईल येथे एकूण ६४,००० चा मुद्देमाल जप्त

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :



अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.

पोलीस स्टेशन बाळापूर हद्दीतील पारस येथे मिळालेल्या गुप्त बातमी वरुन स्थानिक गुन्हे शाखा अकोला च्या टीम ने ०३ ठिकाणी प्रोव्हीशन रेड करण्यात आली आरोपी अंकुश बाळू तीतूर वय ३२ वर्ष, रा धनगर पुरा, पारस ता बाळापूर जिल्हा अकोला याचेकडून १) सखू संत्रा देशी दारू २४ नग निप किंमत २४००/- रू. २) होंडा कंपनीची ऍक्टिवा मोपेड वाहन क्र. चक ३० अड ३७०८ किंमत ५०,०००/- रू.२३) साधा मोबाईल किंमत १०००/- असा एकूण ५३४००/- रू मुद्देमाल मिळून आला त्या नंतर येसान खान जहागीर खान वय ५८ वर्ष, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, पारस ता बाळापूर जिल्हा अकोला १) सखु संत्रा देशी दारू २१ नग निप किंमत २१००/- रू. नंतर आरोपी मिलिंद नागोराव तायडे वय ३१ वर्ष, रा. राहुल नगर, पारस ता बाळापूर १) ४० लिटर गावठी दारू किंमत ४०००/- रूपोलीस स्टेशन बाळापूर हद्दीतील पारस येथे एकूण ०३ प्रोव्हीशन रेड करण्यात आल्या असून एकूण ५९५००/- रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस स्टेशन अकोट फाईल येथे खालील प्रमाणे जुगार रेड करण्यात आली आहे. आरोपी १) अरविंद शिवाजी पाईकराव वय ५५ वर्ष इंद्रा नगर नायगाव २) जावेद शहा लतीफ शहा ३२ वर्ष १८ नंबर शाळा अकोट फाईल ३ ) शेख रफिक शेख रशीद वय ५२ वर्ष राहणार भारत नगर अकोट फाईल याचे कडून एकूण ४५००/- रू नगदी मुद्देमाल मिळून आला पोलीस स्टेशन अकोट फाईल येथे ०१ जुगार रेड करण्यात आली असून एकूण ४५००/- रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी मुदतवाढ

**अकोला :** पी एम श्री जवाहर नवोदय विद्यालयात सहावीसाठी प्रवेशासाठी मुदत १३ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, ९ वी व ११ वीच्या रिक्त पदांसाठी दि. २३ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.प्रवेशासाठी वाढलेल्या मुदतीचा उपयोग करुन उर्वरित वर्ग ५ वीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापकांनी विना विलंब ऑनलाईन पोर्टलव्दारे भरावे. विद्यार्थी सलग ३री ते ५वी मध्ये शिकत असावा. विद्यार्थी व पालक दोन्ही अकोला जिल्ह्याचेच रहिवासी असावेअर्ज करण्याची कोणतीही परीक्षा फी नाही. प्रवेश परिक्षा शनिवार दि. १३ डिसेंबर राहील.इयत्ता ९ वी व ११वीतील रिक्त पदांसाठी ऑनलाईन अर्ज 'सीबीएसईआयटीएमएस' संकेतस्थळावर स्वीकारण्यात येत आहेत. दि. २३ सप्टेंबरपूर्वी अर्ज भरावा. परीक्षा २०२६ मध्ये दि. ७ फेब्रुवारीला होईल. त्याचप्रमाणे, ११वी विज्ञान व वाणिज्य शाखेतील रिक्त जागांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. ते भरण्याची शेवटची तारीख दि. १० ऑगस्ट आहे. अधिक माहितीसाठी पी एम श्री जवाहर नवोदय विद्यालय, बाभूळगांव (जहाँ.) अकोला येथे किंवा ०७२४-२९९१०८७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन प्राचार्य कविता चव्हाण यांनी केले.

# डॉ.किशोर मालोकार यांची राष्ट्रीय होमिओपॅथिक कौन्सिल व्यवस्थापन समिती सदस्यपदी नियुक्ती

## अकोल्याच्या गौरवात भर; केंद्र सरकारकडून ३ वर्षांची जबाबदारी

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :



अकोला शहरातील ज्येष्ठ सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व राजकीय क्षेत्रात गेल्या ४५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या भारतीय जनता पक्षाचे नेते व माजी नगरसेवक डॉ. किशोर मालोकार यांची भारत सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे राष्ट्रीय होमिओपॅथिक कौन्सिलच्या व्यवस्थापन समितीवर सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही महत्त्वपूर्ण नियुक्ती ३ वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे. होमिओपॅथी उपचार पद्धतीचा प्रचार-प्रसार, शैक्षणिक व सामाजिक कार्य, तसेच आरोग्यसेवेचा विस्तार यामध्ये डॉ. मालोकार यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या या दीर्घकालीन कार्याची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार, आयुष मंत्रालय, तसेच राज्य मंत्री नामदार प्रतापराव जाधव आणि खासदार अनुप धोत्रे यांच्या सहकार्याने ही नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना डॉ. किशोर मालोकार यांनी केंद्र सरकार, राज्य शासन, आयुष मंत्रालय, तसेच त्यांना पाठिंबा व आशीर्वाद देणाऱ्या होमिओपॅथिक क्षेत्रातील मान्यवरांचे आभार मानले आहेत. यासोबतच आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांचेही त्यांनी विशेष उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. मालोकार यांच्या निवडीबद्दल अकोला जिल्ह्यातील आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या या राष्ट्रीय जबाबदारीचे कौतुक करत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# हॉकर्स झोन ची वाढली रौनक, खरेदीसाठी हळूहळू ग्राहकांची गर्दी

**अकोला :** गांधी रोडवरील वाहतुकीची समस्या तसेच फेरीवाल्यांचे अतिक्रमण दूर करण्यासाठी प्रशासनाने जी पावले उचललीआहेत त्याला आता यश येताना दिसत आहे या अतिक्रमणधारकांवर कड़क कारवाई केल्यानंतर आता नाईलाजाने का होईना अतिक्रमण धारकांनी आपली दुकाने हॉकर्स झोन मध्ये थाटली आहेत त्यामुळे रस्ते अतिक्रमण मुक्त झाल्याने वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात सुटली आहे हॉकर झोन मध्ये दुकाने थाटल्याने हॉकर्स झोनची रौनक वाढली आहे, हळूहळू ग्राहक हॉकर झोन कड़े खरेदीसाठी वळत आहेत, हॉकर्स झोन मध्ये ही दुकाने काही काळ अशीच राहिली तर नागरिकांना या ऑफर झोन मध्ये खरेदीसाठी येण्याची सवय लागू शकते रस्त्यावरील अतिक्रमण सध्या तरी संपुष्टात आल्याने रस्ते अतिक्रमण मुक्त झाले आहेत त्यामुळे व्यापार करणे आणि ग्राहकांना येण्यासाठी सुविधा निर्माण झाली आहे सध्या महापालिकेतर्फे येथे व्यापार थाटणाऱ्या व्यावसायिकांना सुविधाउपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होत आहे ज्याप्रमाणे नागपुरात जिल्हा पोलीस अधीक्षकांनी वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला होता तसाच प्रयत्न शहरात सफल होताना दिसून येत आहे, शहराला अशाच कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

# महसूल सप्ताहात कागदपत्रांचे वितरण

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या निर्देशानुसार, कुंभारी येथील ग्रामपंचायत कार्यालयात १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत आयोजित 'महसूल सप्ताह'चा १ ऑगष्ट रोजी शुभारंभ झाला. महसूल प्रशासनाशी संबंधित विविध योजना आणि सेवांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवणे, तसेच विभागाचे कामकाज अधिक लोकाभिमुख करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

SIMPLEX MILLS CO. LTD.

**सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : शिवनी गाव, तालुका व जिल्हा - अकोला - ४४४१०४
कॉर्पोरेट ऑफिस: ३०, केशवराव खाड्ये मार्ग,
संत गाडगे महाराज चौक, मुंबई: ०२९-२९४ ५१
Tel No:+91 22 2308 2951 Website : www.simplex-group.com
E-mail : mills@simplex-group.com CIN-L65900MH1998PLC116585

**३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी स्वतंत्र अनधिकृत आर्थिक निकालांचा उतारा**

(प्रति शेअर डेटा वगळता लाखांमध्ये)

| अ. क्र | विशेष | ३०.०६.२०२५ रोजी संपलेला तिमाही (अलेखापरीक्षण) | ३१.०३.२०२५ रोजी संपलेले वर्ष (ऑडिट केलेले) | तिमाही संपली ३०.०६.२०२४ (अनऑडिट) |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | - | 15.90 | - |
| 2 | निव्वळ नफा/ (तोटा) कालावधीसाठी (कर आधी आणि अपवादात्मक वस्तू) | (2.01) | (3.17) | (0.89) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक वस्तूंनंतर) | (2.01) | (3.17) | (0.89) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक वस्तूंनंतर) | (2.01) | (3.17) | (0.89) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी (करानंतर) नफा/ (तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (2.01) | (3.17) | (0.89) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 300.04 | 300.04 | 300.04 |
| 7 | इतर इक्विटी (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) | - | (647.87) | - |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी छ१,०००/-) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी)- (वार्षिकीकृत नाही) मूलभूत आणि सौम्य | (6.71) | (10.57) | (2.97) |

* तिमाहीसाठी वार्षिकीकृत नाही

टिपा:

१. वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या तिमाही आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. त्रैमासिक स्वतंत्र आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.simplex-group.com वर उपलब्ध आहे.

२ वरील निकालांचे पुनरावलोकन लेखापरीक्षण समितीने केले आहे आणि संचालक मंडळाने ५ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत त्यांना मान्यता दिली आहे.

३ वरील आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ (इंड एएस) आणि लागू असलेल्या मर्यादेपर्यंत इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणांनुसार तयार केले आहेत.

४ ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी लेखापरीक्षण न केलेल्या वित्तीय खात्यांचे तपशीलवार स्वरूप खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून पाहता येईल.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५ ऑगस्ट २०२५

सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेडसाठी
स्वा/-
शेखर आर. सिंग
अध्यक्ष
डीआयएन: ०३३५७२८१

# मेंदूचा विकासच नाही तर आरक्षण कळणार कसे ?

कोणतेही कारण नसताना आरक्षणाचा मुद्दा उकरून काढून, आरक्षणावर काही चुकिची माहिती देऊन वाद निर्माण करण्याचे काम मेंदूचा विकास न झालेले लोक करत असतात. आरक्षणाचा लाभार्थी असुनही आरक्षणा बद्दल चुकीचे विधान करणारे प्रत्येक जन बुद्धीने कमकुवतच असतो. आरक्षण जातीला आहे आणि त्यातही एकाच जातीला आरक्षण आहे असे समजणाऱ्यांनी तरी आपल्या बुद्धीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. कारण आरक्षण हे जातीला नसुन प्रवर्गाला आहे.

----------------

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गात २६१ जातींचा समावेश आहे. एसटी प्रवर्गात ४७ जातींचा समावेश आहे आणि एस सी प्रवर्गात ५९ जातीचा समावेश आहे. आणखी विशेष म्हणजे एस सी मधील महार जात सोडली तर बाकी अपवाद वगळता सर्व जाती हिंदू धमार्तीलच आहेत.

ही सर्वसामान्य माहिती ज्याला माहिती नाही तो बुद्धीने गरीबच समजावा. जवळपास सर्वच जातींना आरक्षणाचा फायदा मिळत असताना आरक्षणा बद्दल अपशब्द येतात कसे हा खरा मुद्दा आहे. आरक्षणाबाबत चुकीचे तेच लोक बोलतात एक तर त्यांची बुद्धी कमी आहे नाहीतर ते कोणाचे तरी गुलाम आहेत.

बरेच लोक म्हणतात आरक्षण हे जाती आधारित नाही तर आर्थिक निकषांवर पाहिजे. असे बोलणाऱ्या लोकांच्या डोक्यात मेंदू आहेच की नाही ही शंका निर्माण होते? कारण आरक्षण कोणत्या जातीला आहे? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नाही आणि आरक्षणाची गरज का पडली याचा इतिहास ज्यांना माहिती नाही त्यांनी आरक्षणावर बोलणे म्हणजे आपण निर्बुद्ध असल्याचे सिद्ध करणे होय.

आरक्षण समजण्यासाठी समाज व्यवस्था व इतिहास माहिती असणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट आरक्षणाचे लाभार्थी कोण आहेत हे माहिती असणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास महाराष्ट्रात तेली, साळी, कोळी, माळी, कुणबी, धनगर, बंजारा, वंजारी, अशा सगळ्याच जाती आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या असतील आणि याच जातीतील लोक बुद्धीचा वापर न करता आरक्षणावर बोलत असतील तर ते आपल्याच समाजाचा घात करत आहेत.

आरक्षण आर्थिक निकषांवर नाही कारण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नसुन तो सामाजिक प्रतिनिधित्वाचा प्रश्न आहे. गरीबी हटावसाठी शासनाकडे वेगवेगळ्या योजना असतात त्यावर हजारो करोडो रुपये खर्च होतात. योजना कागदावर आणि पैसे राजकारण्याच्या घरात जातात तो भाग वेगळा पण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नाही.

गरीबी प्रत्येकाची दुर झालीच पाहिजे त्यासाठी सरकारला धारेवर धरून प्रत्येकाने प्रश्न विचारलेच पाहिजे. पण सरकारला प्रश्न न विचारता आरक्षणाला दोष देऊन गरिबी हटाव सोबत संबंध जोडणारा प्रत्येकजन हा बुद्धीने कमकुवत आहे. बरेच स्वंयघोषित विद्वान, सुशिक्षित लोक म्हणतात आरक्षण नकोस बुद्धीमत्तेनुसार संधी असायला हवी.

बुद्धीमत्ते नुसार संधी असायलाच हवी यामध्ये कुठेच दुमत नाही. पण प्रश्न हा आहे की आपल्याला बुद्धीमत्ता पचते का? बुद्धीमत्तेच्या गोष्टी करून आरक्षण नाकारणारे लोक खरचं बुद्धीमत्तेची कदर करणारे असते तर जगातील सर्वात बुद्धीमान महामानव, जगाचा उद्धारक ज्ञानाचा महासागर तथागत सिद्धार्थ बुद्ध आज त्यांच्या घरात असते. बुद्धीमत्तेची जाणीव असती तर सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव संपूर्ण जग करते आणि आपल्या येथे त्यांनाच जातीत बंद केले जाते त्यांनी बुद्धीमत्तेच्या गोष्टी कराव्यात?


विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

बुद्धीमत्तेच्या गोष्टी करणारे बुद्धीहीन लोक संविधान एकाच जातीचे आहे असे म्हणतात त्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे स्वतः च स्वतःच्या बुद्धीने प्रदर्शन मांडणे होय. ज्या लोकांना तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले, शाहु महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर, संत कबीर, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत नामदेव महाराज यांचे विचार व कार्य मान्य नसतील त्यांची बुद्धी किती विकसित असेल याचा अंदाज येतो.

तरीही ते म्हणत असतील बुद्धीमत्ते नुसार नोकरी मिळाली पाहिजे. तर नोकरी बुद्धीमत्ते नुसारच मिळते पण काही प्रश्नांची उत्तरे मिळाली तर चांगले होईल. लग्न बुद्धीमत्ता बघुन होतात की जात? मंदिरात प्रवेश नाकारला जातो बुद्धीमत्ता बघुन की जात? मंदिरात पुजारी असतात बुद्धीमत्ता बघुन की जात? आज पर्यंत भोंदू तयार झाले, पाखंडी तयार झाले, बलात्कारी तयार झाले लाखो लोक त्यांच्या पायावर झुकले बुद्धीमत्ता बघून की जात?

पाखंडी, बलात्कारी, भोंदू लोकांच्या पायावर लोटांगण घेणारे आणि महापुरुषांना वंदनही न करणाऱ्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे आश्चर्यच आहे. आरक्षण हा खुप खोल व गंभीर विषय आहे. आरक्षणामुळे अनेकांना प्रतिनिधित्व मिळाले. ज्यांना गाव बंदी होती, ज्यांच्या सावलीचा विटाळ व्हायचा, मडके बणवणारा, धान्य पिकवणारा, कपडे धुणारा, माळी काम करणारा, मेंढ्या राखणारा, दगड फोडणारा, मेलेली जनावरे ओढणारा आरक्षणामुळे कलेक्टर, पोलीस अधीक्षक सारख्या महत्वाच्या पदावर जाऊन बसले आणि त्यांचा सामाजिक विकास झाला.

आरक्षणावर चुकीचे बोलुन सामाजिक वातावरण दुषित केले जाते. पण सत्य परिस्थिती बघुन समाजाला जागृत करण्याची हिम्मत कोणी करत नाही. आरक्षणाचे लाभार्थी यांना गुणवत्ता धारक वाटत नसतील तर आपण ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही ती परिस्थिती बघू.

आता ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही तेथे जे बुद्धीमान लोक बसलेले आहेत त्यांच्या बद्दल बोलले तर जातीवाद होतो. तरीही आपण उदाहरण म्हणू बघु या. देशात आरक्षण सोडून आयएएस, आयपीएस कोण आहेत? आदिवासी समुहाचे जातप्रमाण पत्र घेऊन कोणी नोकऱ्या हडप केल्या? सर्वोच्च न्यायालयाचा व उच्च न्यायालयाचा मुख्य नायधिश होण्यासाठी कोणतेही आरक्षण नाही तेथे किती तेली, साळी, कोळी, माळी, धनगर, कुणबी, वंजारी, बंजारा लोक आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? का होऊ शकले नाहीत ते न्यायाधीश? एमपीएएसी, युपीएससी मध्ये कुणबी, तेली, साळी कोळी, माळी, धनगर जाती सह ज्यांना ज्यांना आरक्षण आहे त्या उमेदवारांना लेखी परिक्षेत जास्त गुण मिळतात आणि मुलाखती मध्ये कमी गुण मिळतात हे कशामुळे? युपीएससी ची परिक्षा न घेता, आरक्षणाचा विचार न करता सरळ सचिव पदावर दरवर्षी खाजगी क्षेत्रातील उमेदवार बसवले जातात. त्यामध्ये किती कुणबी, मराठा, तेली, साळी, कोळी, माळी धनगर आहेत? यांच्या कडे गुणवत्ता नाही? याचा विचार कोणी करणार आहे की नाही?

औद्योगिक क्षेत्र व प्रसारमाध्यमांमध्ये आरक्षण नाही तर मराठा, तेली, कुणबी, माळी, धनगर, थोडक्यात आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या लोकांच्या किती कंपन्या आहेत? यांच्या किती मोठमोठ्या बँका आहेत? किती टिव्ही चॅनल हे मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार यांचे आहेत? का यांच्याकडे कंपनी सुरू करायला, चॅनल सुरू करायला बुद्धीमत्ता नाही?

बर ते सोडा मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार या पैकी किती लोक मोठमोठ्या मंदिरात पुजारी आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? ज्या ठिकाणी आरक्षण नाही तेथे मक्तेदारी कोणाची आहे? तेथे एकच लॉबी कशी काय टिकुन आहे? हा मुळ प्रश्न असताना तो बाजूला सारून आरक्षणावर बोलुन बुद्धीचे प्रदर्शन मांडले जाते.

आरक्षणाच्या नावाखाली एकाच जातीला लक्ष केले जाते. जेथे आरक्षण नाही तेथे कोणत्या जातीचे लोक राहतात हा साधा प्रश्न जरी केला तरीही जातीवाद होतो. म्हणून आरक्षण हे सर्वांना समान संधी देऊन सामाजिक प्रवाहात सर्वांना समान करते. म्हणून सामाजिक आरक्षण हे भारतीय समाजाला खुप आवश्यक आहे.

विद्वत्तेच्या पोकळ गप्पा करणाऱ्या जर संविधानाचे गांभीर्य नसेल त्या व्यक्तीएवढा मंद व्यक्ती दुसरा कोणीही नसेल. म्हणून आरक्षणावर बोलणे, आरक्षण समजून घेणे, हे येड्या गबाळाचे काम नाही. फालतू सोशल मिडीयावर येऊन नको ते कुटाणे करून स्वतः आरक्षणाचे लाभार्थी असताना आणि सामाजिक विकासासाठी आरक्षणा शिवाय दुसरा पर्याय नसताना आरक्षणाबाबत चुकीचे बोलणे म्हणजे स्वतःच्या पायावर स्वतः च कुऱ्हाड मारून आपली बुद्धी किती कमकुवत आहे हे दाखवणे होय.

----------------

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

# आमिषाचं षडयंत्र रचून लाडक्या बहिणींच्या भावनांशी खेळ

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वगार्तील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी लाडकी बहीण योजना सुरू केली होती.

------------

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र आहे. त्याद्वारे १५०० रूपये हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जात आहे. सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी असून, २१०० रूपयांचा हप्ता तर कोसो दुरच राहिला, पण सध्या १५०० रूपयांचाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असून सरकार फक्त आश्वासने देत आहे. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार आहे, असं म्हणायला हरकत नाही.

सध्या महायुती सरकारमधील तिन्ही भावांना लाडक्या बहिणींचा विसर पडल्याचं दिसून येत आहे. मे आणि जून महिन्याचा हप्ता काही लाडक्या बहिणींना अद्याप मिळालेला नाही, असं लाडक्या बहिणींची ओरड सुरु आहे. योजनेच्या तांत्रिक बाबींमुळे बहिणींच्या खात्यात हप्ता येणे थकले आहे. आता, ज्यांच्या कौंटुबिक उत्पन्नात वार्षिक एक लाख रुपये येतात, त्यांना या योजनेतून वगळण्यात येईल असे म्हणतात.

तुम्ही कोणतंही काम कराल तरी महिन्याला दहा हजार रुपये इतका पगार मिळतोच आणि प्रत्येक कुटुंबात एखादा तरी दहा हजार रुपये कमावणारा असतोच असतो. म्हणजे 'काम झालं माझं आणि काय करू तुझं' या उक्तीप्रमाणे इतर निकषांच्या आधारे कित्येक लाडक्या बहिणींना वगळण्याचा प्लॅन आहे. यावरून सिद्ध होते की, ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार होता.



दुसऱ्या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ४५०० रूपये खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली.

पण हीच 'लाडकी बहीण योजना' आता पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडत आहे. या योजनेद्वारे सुमारे दीड कोटी बहिणींना निधी वाटण्यात आला आणि नंतर कळले की निकषात न बसणाऱ्या बहिणींनाही हा निधी घेण्याचा मोह आवरला नाही. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. सध्या राज्याची आर्थिक अवस्था 'आमदनी अठ्ठनी खर्चा रुपया' अशी झाली आहे.

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प अधिवेशनाच्या काळात विधिमंडळात मांडला. या अहवालात लाडकी बहीण योजनेची माहिती देण्यात आली. या योजनेत जून २०२४ पासून डिसेंबर २०२४ या ७ महिन्याच्या कालावधीत २ कोटी ३८ लाख लाभार्थी बहिणींना निधी देण्यात आला. हा निधी तब्बल १७,५०५ कोटी रुपये इतका होता.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नाही. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५०० रूपयांचा हप्ता थेट २१०० रूपये करण्याचे आश्वासन दिले आणि महायुती सरकार मोकळे झाले. राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली.

या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली. लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हप्ता ७ मे दरम्यान देण्यात आला होता. आता, मे ते जुलै महिन्याचे ४५०० रूपये कधी मिळणार, याची प्रतिक्षा आहे.

दरम्यान, अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेत चूक झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे निधी मिळणार की नाही, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. लाडकी बहीण योजनेत १५०० रूपयांचा हप्ता २१०० रूपये कधी होणार हे तर दुरच राहिले. आता १५०० रूपये तरी मिळणार की नाही, असा प्रश्न बहिणींना पडत आहे.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढत आहे. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली आहे. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे.

कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारी कर्मचा-यांना लाभ बंद केल्याबाबतची माहिती दिली.

५ महिन्यांपूर्वी लक्षात आले की सरकारी महिला कर्मचारी लाभ घेत आहेत. त्यामुळे त्यांना बंदी घालण्यात आली. आता तर महिला आणि बालविकास विभागाने केलेल्या ऑडिटमध्ये असे आढळून आले आहे की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत १४,००० हून अधिक पुरुषांनी फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवले आहेत.

ऑडिटमध्ये असे म्हटले आहे की या योजनेअंतर्गत १४,२९८ पुरुषांना २१.४४ कोटी रुपये वितरित करण्यात आले. पण जेव्हा सरकारी महिला कर्मचारी आणि पुरुष लाभ घेत होते, तेव्हा निकष तपासणारे काय करत होते? त्यामुळे या पुरुषांवर कार्यवाही होणार का आणि त्यांच्याकडून दिलेली रक्कम वसूल करण्यात येईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आतापर्यंत सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी सुरू होती. त्यामुळे जवळपास ५० लाख बहिणींना वगळण्यात आले. ही पडताळणी पुढेही सुरू ठेवली असती, पण येणाऱ्या मनपा, नप, जिप, पंस व ग्रापं निवडणुकीचा विचार करता ही प्रक्रिया तात्पुरती बंद करण्यात आली. एवढेच नव्हे तर रक्षाबंधनचे औचित्य साधून ज्या बहिणींचे मे पासूनचे हप्ते थकले, त्यांना मे ते ऑगस्ट असे ४ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ६००० रूपये तर चालू बहिणींना जुलै व ऑगस्ट असे २ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ३००० रूपये देऊन आमिषांच्या षडयंत्रात अडकवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

परंतु लाडक्या बहिणींच्याही आता लक्षात येऊ लागले आहे की, हे महायुतीचे सरकार फसवे आहे. म्हणून लाडक्या बहिणींनो सरकार कोणतीही अक्कल लढविली, तरी त्यांच्या अकलेच्या तमाशाला भुलून जावू नका आणि त्यांच्या चक्रव्युहात अडकू नका.

तसं पाहता महायुती सरकारमध्ये जनतेला फेस करण्याची ताकद उरली नाही. म्हणूनच तर जन सुरक्षा विधेयक पारीत करून सामान्य जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा व सर्वाधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण लाडक्या बहिणींनो तुमच्यात हे विधेयक हाणून पाडण्याची ताकद आहे. त्यामुळे ते पारीत होण्यापूर्वीच हाणून पाडा. एकदा का हे विधेयक पारीत झाले तर मग कोणत्याच गोष्टीसाठी तुम्ही लढू शकणार नाही. त्यामुळे आताच जागे व्हा, उठा आणि लढा..! ■ ■ ■

# पाठीचा कणा, मणक्याचे विकार आणि आयुर्वेद

मागील काही वषार्पासून मणक्याचे विकार व त्याच्याशी संबंधित पाठ दुखी, कंबर दुखी, मान दुखी खूप प्रमाणात वाढली आहे.

**स्पॉन्डिलायटिस :**

हा शब्द वाचता चटकन तुमच्या डोळ्यांसमोरया आजाराने ग्रस्त असलेल्या असंख्य व्यक्तींचे नाव पुढे आली असतील. प्रथम बरेच दिवस हात दुखणे, मान दुखणे, सकाळी पाठ दुखणे, कंबर दुखणे, खांद्याला कळ लागणे ही लक्षणे दिसतात.

मेंदूकडून संपूर्ण मास पेशींना आदेश देण्याकरिता मणक्यांमधून वात नाडया, त्या त्या मांसपेशीना जात असतात . या मणक्यामध्ये एक मऊ गादी असते या गादीमुळे पण मणके एकमेकांना घासले जात नाही व या वातनाडी आपल्या संदेशवहनांचे कार्य आव्यहतपणे करीत असतात. काही कारणांनी गादी झिजली गेली की मणक्याचे संघर्ष सुरू होणे व वातनाडीवर दाब पडून विविध लक्षणे निर्माण होतात. मानेपासून कमरेपर्यंत कुठलीही विकृती घडू शकते.

परंतु मान व कंबर हे भाग सातत्याने ताणवतात असतात हालचालीत असतात, फिरत असतात म्हणून हे दोन भाग प्रथम घासले जातात. याच्या तीव्रतेवरून मणक्याचे अनेक विकार निर्माण होतात . पाठीच्या मणक्यामध्ये सहजासहजी अधिक आघात झाल्याशिवाय बदल होताना दिसत नाहीत. त्यामुळे मणक्याच्या गादीचे पोषण झाल्याशिवाय ही व्याधी बरी होणार नाही.

**आयुर्वेदाचे उत्तम उत्तर :**

ही व्याधी आयुर्वेदिक चिकित्सेने सहज थांबू शकते. पुराण काळापासून संधी हाड यासाठी आयुर्वेदिक चिकित्सा प्रसिद्ध आहे. आयुर्वेदिक निदान पद्धतीमध्ये सूक्ष्म विचार केला जातो वाताच्या विकृतीने अस्थिद्धातू व मज्जा धातू यांना विकृती होत असते.

व्यक्तीप्रमाणे हे निदान बदलले जाते व त्यामुळे औषधी चिकित्सा, पंचकर्म चिकित्सा बदलते.

मणक्याच्या विकाराचे निष्कर्ष काढल्यास असे दिसून येते की, बँकेतील कर्मचारी दिवसभर कॉम्प्युटरवर काम करतात शिक्षक, कंपनीमध्ये विशिष्ट चालीत काम करणारे , वजन उचलणारे, शेतात पुढे वाकून काम करणारे या व्यक्तीमध्ये मणक्याचे विकाराचे प्रमाण अधिक आहे. उच्चपदस्त व्यक्तिमध्ये मान खाली घालून, गाडीत विशिष्ट स्थितीतील बसून राहण्याचे हा आजार बळवताना दिसतो. सतत थंड हवेच्या संघर्षात असल्याने वात वृद्धी होऊन स्थानी जखंडून मणक्यांना त्रास संभवतो.

रस्त्यावरील गातीरोधक रस्त्यावरील खड्डे दुचाकी वाहनांवर जास्त फिरणे व या



कारणांनी मणक्यावर अधिक ताण पडून गादीला जखम पोहोचते.

**आयुर्वेदिय चिकित्सा :**

मणक्याच्या विकारांमध्ये बसून उठताना, झोपून उठताना चक्कर येणे, फेकल्यासारखे होणे ,ही लक्षणे हल्ली जास्त दिसून लागलेली आहेत .वात नाडीवरील दाबामुळेच ही लक्षणे निर्माण होतात.

**उपचार :**

वेदनाशामक औषधे घेणे ,तात्पुरते वजन लावून दाब कमी करणे, हे उपचार तात्पुरतेच असतात,परंतु आयुर्वेदिक दृष्ट्या आहार , विहार व व्यायाम वातनाशक औषधे याचा संगम केल्यास संपूर्ण आराम मिळताना अनेकांना दिसतो.

**औषधी चिकित्सा :**

रुग्णांच्या प्रकृती प्रमाणे वात नाशक अमृता गुग्गुळ,केशर गुग्गुळ सुवर्णकल्प असलेले बृहत्वात चिंतामणी रस, सुर्वणमालिनि,कुमार कल्याण, तसेच एकांगवीर, महावत विध्वंस वापरता येतात.

ही औषधे वेदना तर कमी करतातच, वातनाळ्यांमध्ये पोषण करून शक्तीही देतात. वातांचे नियमन करताना शरीरतील वात सम झाल्यास मणक्याचे सांध्याचे पोषणही उत्तम होऊन आराम मिळतो. सांध्याचे पोषण करणे ही कल्पना आयुर्वेदाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**मलावष्टंभ :**

शौचाला साफ होऊन वात सरणे हे वात दुष्टीचे कारण नष्ट करण्याकरिता एरंड तेलासारखे औषध नाही . कोरडेपणा आणून वात वाढणारे रोचक वापरू नये.

**पंचकर्म चिकित्सा :**

पंचकर्माचा उपयोग मणक्याच्या विकारांमध्ये एखाद्या चमत्कारासारखा होताना दिसतो- स्नेहन, स्वेदन, बस्ती , कटी बस्ती , हे प्रकार या विकारावर वैशिष्ट्य तेलाचा उपचार करून वापरता येतो.

स्नेहन-मणके हे साधे असून वाताचा अधिकार त्याच्यावर जास्त असतो.सांध्यांमधील स्तंभता, जखडणे, स्नायूचे आकुंचन हे वाताचे रुक्ष गुण वाढण्याचे फलित असते. स्नेहा नाणे ही विकृती काढते मलावष्टभाने वाढलेला वात मणक्याच्या व्याधीचे मुख्य कारण ठरतो.

**आहारीय कारणे :** फास्टफुड, मधाचे विविध पदार्थ, आंबवलेल पदार्थ, शीतपेय शीळ अन्न यांनी वात वाढतो.

पंचकर्मातील तेल हे व्याधी, अवस्था, स्थिती, वय याचा विचार करून विविधतेलांनी अभंग करतात. यात मधुमेह, स्थूल व्यक्ती, स्त्रिया बालक याप्रमाणे वेगवेगळे तेल घेतले जातात. जसे मधुमेही साठी धन्वन्तरम, बलातेल, बला अश्वगंधादी तेल, सहचारादि, अमृतादि तेल.

स्वेदन - औषधाची स्टीम सामान्यत : दशमुळे, बला , निर्गुंडी इं वनस्पतीचे काढे वापरतात.

**बस्ती :**

वाताच्या नियमाची श्रेष्ठ चिकित्सा

शुद्धनिर्जूक्त, तूप, काढे यांचा बस्ती ३, ५, ७, १४, २१दिवस दिला जातो.

तेल तूप शरीराते राहून मणक्याचे, सांध्याचे वातनाडीचे तात्काळ पोषण करून परिणाम दाखवतात.

याप्रमाणे कटीबस्ती , पिंडस्वेद, विविध आसने आणि आहार-विहारमध्ये बदल करून, आयुर्वेदिक औषधे व पंचकर्म घेऊन करून आपण नक्कीच आपल्या पाठीच्या मणक्याची काळजी घेऊ शकतो व पाठीचा कणा ताठ करून आजारापासून मुक्त होऊ शकतो . सर्व प्रक्रिया औषधेही तज्ञ आयुर्वेदिक व पंचकर्म तज्ञ वैद्याकडून घ्यावे.

Dr. Priya Authentic Ayurveda
Panckarma Centre
Benam chowk, Beside Bank of Baroda,Sai Nagar
7588085975

■ ■ ■

वाचक लिहितात

## राखीची सात्विकता जपूयात

बहीणभावांचे प्रेम वृध्दींगत करणारा रक्षाबंधन हा सण सगळीकडे आनंदाने साजरा होतो. प्रत्येक बहीण भावाला, भाऊ नसेल तर नात्यातील एखाद्या भावाला किंवा मानलेल्या भावाला राखी बांधते.

सध्या अधुनिकतेच्या नावाखाली राख्यांचे विविध प्रकार पहायला मिळतात. ॐ, स्वस्तिक, देवतांची चित्रे असलेल्या राख्या तसेच अनेक प्रकारचे वेडेवाकडे हावभाव करणाऱ्या कार्टूनच्या राख्या रक्षाबंधनाच्या सणापूर्वीच बाजारात विक्रीस येतात. ॐ, स्वस्तिक, देवता यांच्या राख्या सात्विक असल्या तरी सण झाल्यावर इकडेतिकडे , कचऱ्याच्या ढिगाऱ्यात पडलेल्या दिसतात. प्रसंगी पायदळी तुडवल्या जातात. यामुळे या चिन्हांचा, देवतांचा अपमानच होतो. कार्टूनच्या राख्या ह्या आकर्षक रंगसंगती व पोषाखातील असल्याने घेणारा त्याकडे आकर्षित होऊन खरेदि करतो. कार्टून राख्या असात्विक असतात. कार्टूनच्या राख्यांमुळे लहान मुले शास्त्र माहीत नसल्याने थोडावेळ आनंदीत होतात. अशा राख्या बांधून अध्यात्मिक लाभ होत नाही व सणाचा हेतू साध्य होत नाही. सणाचा आनंद मिळवण्यासाठी शास्त्र समजून घेऊन सात्विक राख्या बांधूयात.

■ दिपाली गिते, सातारा.

## कान उपटूनही वाचाळवीर सूसाट

महायुती सरकारमध्ये वादग्रस्त विधान करण्याची काही आमदार आणि मंत्र्यांमध्ये जणू स्पर्धाच लागली आहे. त्यात भाजपा आणि शिंदेसेनेचे मंत्री, आमदार आघाडीवर दिसतात. मंत्री आणि आमदारांच्या अशा बेताल वक्तव्यांमुळे समाजातून संताप व्यक्त होत असल्याने आणि सरकारची छी थू होवू लागल्याने अखेर मुख्यमंत्री फडणवीस यांनी काही मंत्र्यांचे कान उपटले, समज दिली. माणिकराव कोकाटे या मंत्र्यांचे खाते बदलण्यात आले. तरीही, वाचाळवीर आटोक्यात येत नसल्याचे दिसते. मनोहर भिडे नावाचा एक माणूस गेली कित्येक वर्षे वादग्रस्त विधान करून समाजात दुही निर्माण करण्याचे, विष कालवण्याचे काम करतो. आजही त्याने सर्वधर्म समभाव म्हणजे ना धड पुरूष.. ना धड स्त्री... लाल किल्ल्यावर भगवा फडकवा.. असे वादग्रस्त विधान केले आहे. सरकारची याला फूस आहे का? असल्या विकृतीवर कारवाई का होत नाही?

■ भूषण पाटील, नागपूर.



# दीर्घायुष्यासाठी हे ७ नियम पाळा

आजच्या काळात १०० वर्षांपेक्षा जास्त जगणं, तेही पूर्णपणे निरोगी आणि सक्रिय राहून, हे अनेकांना अशक्य वाटतं. पण एका १०१ वर्षांच्या डॉक्टरने हे शक्य असल्याचं सिद्ध केलं आहे. या डॉक्टरने आपल्या आयुष्यात काही साध्या पण महत्त्वाच्या सवयी अंगीकारल्या, ज्या त्यांनी दीघार्युष्याचे रहस्य म्हणून जगासोबत शेअर केल्या आहेत. हे नियम कोणत्याही महागड्या औषधोपचारांवर किंवा विशिष्ट जनुकीय रचनेवर आधारित नाहीत, तर रोजच्या जीवनातील निवडक सवयींवर अवलंबून आहेत.

**डॉक्टरचे ७ लाइफस्टाइल सीक्रेट्स**

या डॉक्टरने अनेक दशकांपासून या सवयी पाळल्या आहेत आणि आता ते त्या जगाला सांगत आहेत.

**तंबाखूला ना म्हणा :** या डॉक्टरने नेहमीच धूम्रपानापासून स्वतःला दूर ठेवले. धूम्रपान हे अकाली मृत्यूचे एक मोठे कारण आहे, असे ते ठामपणे मानतात.

**दारूचे सेवन टाळा :** त्यांनी कधीही दारूचे सेवन केले नाही. त्यांच्या मते, दारूमुळे कर्करोग आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो, ज्यामुळे आयुष्य कमी होतं.

**जिमऐवजी मैदानी व्यायाम :** त्यांच्या फिटनेसचे रहस्य गार्डनिंग आणि घराबाहेर केलेली कामे आहे. जिममध्ये जाऊन कठोर व्यायाम करण्याऐवजी, ते नैसर्गिकरित्या सक्रिय राहण्यावर भर देतात. ते सांगतात की, विशेषतः ४० ते ७० या वयामध्ये सक्रिय राहणे खूप महत्त्वाचे आहे, कारण याच काळात आरोग्याच्या समस्या सुरू होतात.

**इंटरमिटेंट फास्टिंग :** निरोगी वजन आणि चयापचय क्रिया उत्तम ठेवण्यासाठी ते फक्त नाश्ता आणि दुपारचं जेवण करतात, रात्रीचं जेवण टाळतात. यामुळे शरीराला आराम मिळतो आणि पचनशक्ती सुधारते.

**आयुष्यभर शाकाहार :** गेल्या 20 वर्षांपासून ते शाकाहारी आहेत. त्यांच्या आहारात दूध आणि अंडी यांचा समावेश आहे, पण कोणत्याही प्रकारचे मांस नाही. शाकाहारामुळे अनेक गंभीर आजार टाळता येतात, असा त्यांचा विश्वास आहे.

**गोड पदार्थ कमी करा :** ते अतिरिक्त साखरेऐवजी फळे आणि इतर नैसर्गिक गोड पदार्थांना प्राधान्य देतात. यामुळे लठ्ठपणा आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

**सॅचुरेटेड फॅट टाळा :** त्यांच्या आहारात सॅचुरेटेड फॅट कमी असते, ज्यामुळे हृदयरोगाला प्रतिबंध होतो आणि रक्तवाहिन्या निरोगी राहतात.

या डॉक्टरची गोष्ट आपल्याला हे शिकवते की, निरोगी आणि दीघार्युष्यासाठी कोणत्याही विशिष्ट डाएट किंवा महागड्या उपचारांची गरज नाही. साधेपणा, सातत्य आणि शिस्त या तीन गोष्टींवर त्यांनी जोर दिला. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### खिरापत

आळीपाळीने
मंत्रीपद घेवू
वाटून सारे
खिरापत खाऊ..

जगा व जगू द्या
आमचे आहे तत्व
टिकून राहिले पाहिजे
भौ पक्षाचे अस्तित्व...

स्वार्थासाठीच आम्ही
हात मिळवणी करतो
राजकीय फायदे
पदरात पाडून घेतो!

# १२ वर्षीय मुलाच्या दुर्मिळ हृदयविकारावर आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा येथे यशस्वी उपचार, ओपन-हार्ट शस्त्रक्रियेची गरज टळली



**अकोला, ५ ऑगस्ट :** सावंगी (मेघे), वर्धा येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील कार्डिॲक कॅथेटरायझेशन प्रयोगशाळेत १२ वर्षीय मुलाच्या दुर्मिळ जन्मजात हृदयविकारावर मिनिमली इनवेसिव्ह स्टेंटिंग पद्धतीने यशस्वी उपचार करण्यात आले. या प्रक्रियेने पारंपरिक ओपन-हार्ट शस्त्रक्रियेची आवश्यकता पूर्णपणे टळली.

सदर मुलाला सुपीरियर वेना कावा (एसव्हीसी - शरीराच्या वरच्या भागातून (डोके, मान, हात) आलेले अप्राणवायू युक्त रक्त हृदयाकडे आणणारी मोठी शीर ) आणि उजवे आलिंद (उजवा कर्णिका - हृदयातील वरचा उजव्या बाजूचा कप्पा, ज्यात शरीरातून आलेले रक्त प्रथम साठते आणि नंतर पुढच्या कप्प्याकडे जाते.) यांच्या जोडणीच्या ठिकाणी आढळणाऱ्या एट्रियल सेप्टल डिफेक्ट (एएसडी) या अत्यंत दुर्मिळ प्रकाराच्या आजाराचे निदान झाले होते. अशा प्रकारचा दोष बालरुग्णांमध्ये क्वचित आढळतो, आणि अशा प्रकरणांमध्ये स्टेंटिंगची पद्धत अवलंबली जाणे तर अत्यंत दुर्मिळ असते.

या प्रसंगी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा येथील हृदयरोग विभागप्रमुख प्रा. डॉ. गजेन्द्र अग्रवाल म्हणाले, पीएपीव्हीसी सह एसव्हीसी दोषाचा ट्रान्सकॅथेटर क्लोजर हा मुलांमधील दुर्मिळ जन्मजात हृदयविकाराच्या उपचार पद्धतीत आमूलाग्र बदल घडवत आहे. योग्य रुग्ण निवड व प्रगत तंत्रज्ञानामुळे आपण आता सुरक्षित, कमी आक्रमक पर्याय उपलब्ध करून देऊ शकतो ज्यामुळे उपचारांचे परिणाम आणि रुग्णांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होते.

या उपचारप्रक्रियेत एव्हीबीआरएच वर्धा कॅथ लॅबच्या कार्डिॲलॉजी टीममधील डॉ. आकाश लोखंडे, डॉ. हर्षल पावडे, डॉ. चेतन राठी, डॉ. वैभव राऊत आणि डॉ. वैभव महाले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या सामूहिक कौशल्य, समर्पण आणि काटेकोर नियोजनामुळे हा जटिल उपचार यशस्वी आणि सुरक्षितपणे पार पडला.

प्रक्रियेची ठळक वैशिष्ट्ये:
रुग्णाची पात्रता निश्चित करण्यासाठी अत्याधुनिक मल्टिमोडॅलिटी इमेजिंगचा वापर.
हस्तक्षेपाची प्रत्येक पायरी रुग्णाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन काटेकोर नियोजन.
ट्रान्सकॅथेटर क्लोजर तंत्राचा वापर कमी आघात करणारी आधुनिक पद्धत जी मोठी शस्त्रक्रिया टाळते आणि जलद पुनर्वसनास मदत करते.

प्रक्रियेनंतर सहा महिन्यांनी हा बालरुग्ण पूर्णपणे निरोगी असून कोणत्याही लक्षणांशिवाय किंवा गुंतागुंतीशिवाय आनंदी जीवन जगत आहे.

ही यशस्वी उपचारप्रक्रिया एव्हीबीआरएचच्या हृदयरोगतज्ज्ञांच्या कौशल्य व नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. मुलांमधील अशा जटिल जन्मजात हृदयविकारांवर मात करणे हा एक महत्त्वाचा टप्पा असून, इंटरव्हेन्शनल पीडियाट्रिक कार्डिओलॉजीमध्ये हे रुग्णालय एक उत्कृष्ट केंद्र म्हणून आपली ओळख अधिक दृढ करत आहे.

# कॅलिफोर्निया बदामांसह निरोगी रक्षाबंधन साजरे करा



**नागपूर, ५ ऑगस्ट :** रक्षाबंधन म्हणजे भावंडांच्या प्रेमाचा आणि नात्याचा सण. बहिणी भावांसाठी त्यांची काळजी आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात, तर भाऊ त्यांच्या संरक्षणाची शपथ घेतात. यंदा, या प्रेमळ नात्याला साजेसा आदर दाखवा तुमच्या भावंडाच्या दीर्घकाळ टिकणाऱ्या आरोग्यासाठी आरोग्याला प्राधान्य सणावैभवात स्वादिष्ट जेवणं आणि गोड पदार्थांचा आस्वाद घेणं सहसा होतं. सण आनंदात साजरा करणं नैसर्गिकच आहे, पण त्याचवेळी संतुलित आणि आरोग्यदायी निवडी करणंही गरजेचं आहे. या रक्षाबंधनाला, रोजच्या आहारात कॅलिफोर्निया बदाम घालून सण अधिक खास आणि निरोगी बनवा.

बदाम हे आवश्यक पोषणतत्त्वांनी परिपूर्ण असून ते दीर्घकालीन आरोग्याच्या उद्दिष्टांना साध्य करण्यात मदत करतात. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करण्यापासून ते एलडीएल आणि एकूण कोलेस्टेरॉल कमी करण्यापर्यंत, बदाम हृदयाच्या आरोग्यासाठी आणि एकंदर तंदुरुस्तीसाठी उपयुक्त आहेत. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्याने आरोग्यदायी आणि यशस्वी भविष्याची पायाभरणी होते.

सणासुदीच्या जेवणाची तयारी करताना, साखरेच्या जागी नैसर्गिक गोड पदार्थ वापरण्याचा विचार करा आणि तळलेल्या पदार्थांच्या ऐवजी बेक केलेले पदार्थ निवडा. अशा लहान पण महत्त्वाच्या बदलांनीउदाहरणार्थ, तुमच्या सणांमध्ये कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करूनतुम्ही एकत्र येण्याच्या हंगामाचा आनंद घेत असताना तुमच्या कुटुंबाच्या आरोग्य, आनंद आणि दीर्घकालीन समृद्धीची काळजी देखील घेऊ शकता.

बॉलिवूड अभिनेत्री सोहा अली खान म्हणतात, रक्षाबंधन हा माझ्या कुटुंबासाठी अत्यंत खास दिवस आहे. मी ग्रील्ड बदामांची बर्फी आणि बदामाचे ब्राउनीस यांसारख्या निरोगी आणि स्वादिष्ट पदार्थांची तयारी करते. रोज सकाळी माझ्या नवऱ्याला आणि मुलीला बदाम देणे माझी एक आवर्जून केलेली सवय आहे, जी सणांनाही कधीही चुकवलेली नाही. बदाम केवळ स्वादिष्ट नसून आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक आहेत, म्हणून मी शक्य तितक्या जेवणांमध्ये त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करते.

मॅक्स हेल्थकेअर, दिल्ली येथील रिजनल हेड डायटेटिक्स ऋतिका समद्दार म्हणतात, रक्षाबंधनसारख्या सणांच्या काळात लोक अनेकदा त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांविषयी जागरूक न राहता अस्वास्थ्यदायी अन्नाचा अतिरेक करतात. मी शिफारस करते की, सण निरोगी आणि सजगपणे साजरे करावेत, जसे की बदामांसारख्या पोषक पर्यायांचा समावेश करणे. आवश्यक पोषणतत्त्वांनी परिपूर्ण बदाम हे अस्वास्थ्यदायी स्नॅक्सचा उत्तम पर्याय असून, ते सणासुदीच्या जेवणांमध्ये सहज वापरता येतात. ताज्या आयसीएमआर आहार मार्गदर्शक तत्त्वांनुसार बदाम हा रोजच्या आहारात घेतला जाणारा पौष्टिक पदार्थ आहे, जो वनस्पती प्रथिनांसह दीर्घकालीन आरोग्याचे समर्थन करतो. नियमित बदाम सेवनाने केवळ वैयक्तिक आरोग्यच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाची समृद्धी आणि कल्याण वाढते.

शिला कृष्णस्वामी, पोषण आणि आरोग्य सल्लागार म्हणाल्या, रक्षाबंधनच्या सणात गोड पदार्थ महत्त्वाचे असतात, पण त्याचा रक्तातील साखरेवर आणि एकंदर आरोग्यावर होणारा परिणाम अनेकदा दुर्लक्ष केला जातो. साखरेचे सेवन केल्याने ग्लुकोजची पातळी अचानक वाढू शकते, जे मधुमेह किंवा पूर्व-मधुमेह असलेल्या लोकांसाठी विशेषतः चिंतेचे कारण आहे. हा सल्ला त्या सर्वांसाठी आहे ज्यांना सणासुदीच्या काळात गोड पदार्थांमुळे चिंता वाटतेतुम्हाला निरोगी राहण्यासाठी गोड पदार्थ टाळावेच लागणार नाही. पोषणतज्ज्ञ म्हणून, मी सुचवते की सणाच्या काळात बदाम आणि ताजे फळे यांसारखे आरोग्यदायी पर्याय निवडावेत. बदाम प्रथिने आणि तंतूमय पदार्थांनी समृद्ध असतात, आणि संतुलित आहारात त्यांचा समावेश केल्यास रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते तसेच हृदयाचे आरोग्यही टिकवून ठेवते.

# टाटा एआयजी विद्यार्थी प्रवास विमा: परदेशातील विद्यार्थ्यांसाठी एक सुरक्षा कवच

**मुंबई, ५ ऑगस्ट :** देशातील आघाडीची विमा कंपनी, टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने विद्यार्थी प्रवास विमा ही परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली एक व्यापक योजना सादर केली आहे. ही योजना अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय समस्या आणि प्रवासातील आव्हानांपासून आर्थिक संरक्षण देते, ज्यामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांना मनःशांती मिळते.

टाटा एआयजी जनरल इन्शुरन्सचे उपाध्यक्ष - कन्ज्युमर अंडररायटिंग डॉ. चंद्रकांत सैद म्हणाले, टाटा एआयजीमध्ये, शिक्षणाच्या नवीन जगात पाऊल ठेवताना विद्यार्थ्यांसमोर येणारी आव्हाने आम्ही समजू शकतो. आमची विद्यार्थी प्रवास विमा योजना व्यापक संरक्षण आणि मनःशांती प्रदान करते, जेणेकरून विद्यार्थी त्यांच्या भविष्यावर लक्ष केंद्रित करू शकतील जे खरोखर महत्वाचे आहे.

क्लेम सेटलमेंट सहजपणे व्हावे यासाठी सहाय्य आणि जागतिक पाठिंब्यासह, टाटा एआयजी विद्यार्थी आणि पालकांसाठी एक विश्वासार्ह भागीदार बनली आहे, ज्यामुळे परदेशात सुरक्षित शैक्षणिक प्रवास सुनिश्चित होतो.

# शक्ती पंप्सची २०२६ च्या पहिल्या तिमाहीत निर्यात वाढीसह उत्कृष्ट कामगिरी

**नागपूर, ५ ऑगस्ट :** शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले.



शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडचे अध्यक्ष दिनेश पाटीदार यांनी कंपनीच्या कामगिरीवर भाष्य करताना सांगितले, आम्हाला आर्थिक वर्ष २०२६ च्या मजबूत सुरुवातीची घोषणा करताना आनंद होत आहे, जी आमच्या वैविध्यपूर्ण व्यवसाय मॉडेलची ताकद दर्शवते. या तिमाहीतील आमची कामगिरी सोलर पंप सेगमेंटमधील मजबूत अंमलबजावणी, सातत्यपूर्ण निर्यात वाढ आणि क्षमता व तंत्रज्ञानातील दीर्घकालीन गुंतवणुकीमुळे प्रेरित झाली आहे. आम्ही पीएम-कुसुम योजनेत सुमारे २५% बाजारपेठेतील हिस्सा राखून, प्रमुख भारतीय कृषी राज्यांमध्ये आघाडीवर आहोत. १ ऑगस्ट २०२५ पर्यंत आमची ऑर्डर बुक सुमारे १,३५० कोटी इतकी होती, ज्याला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि झारखंड यांसारख्या राज्यांकडून स्थिर ऑर्डर्सचा पाठिंबा मिळाला आहे.

ते पुढे म्हणाले, रूफटॉप सोलर सेगमेंटला पीएम सूर्य घर: मोफत वीज योजना यांसारख्या सरकारी योजनांमुळे गती मिळत आहे. आम्ही या क्षेत्रात आमची उपस्थिती सतत वाढवत आहोत. त्याचबरोबर घरगुती, औद्योगिक आणि ईव्ही सेगमेंटमध्येही आमचे प्रयत्न सुरू आहेत. गेल्या चार वर्षांमध्ये सुमारे २५% दराने वाढलेला आमचा निर्यात व्यवसाय हे आमच्या विकासाचे एक प्रमुख कारण आहे. हैती, युगांडा, बांगलादेश आणि नेपाळमधील यशस्वी प्रोजेक्ट्स आणि अमेरिका, मध्य पूर्व व आफ्रिकेतून वाढत्या मागणीमुळे, ही गती कायम ठेवण्याच्या आमच्या क्षमतेवर आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

संचालन स्तरावर, कंपनीने वर्किंग कॅपिटल सायकल सुधारण्यासाठी लक्षणीय प्रगती केली आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये सरासरी १७८ दिवस असलेले रिसीवेबल डेज आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १५२ दिवसांपर्यंत कमी करण्यात आले असून आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस ते अंदाजे १२० दिवसांपर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे.

पाटीदार म्हणाले, पुढे, आम्ही आर्थिक वर्ष २०२६ मध्ये २५-३०% महसूल वाढ देण्यास आणि पुढील ३-४ वर्षांसाठी ही गती राखण्यास कटिबद्ध आहोत. स्वच्छ ऊर्जेवर आमचे धोरणात्मक लक्ष, कामकाजातील शिस्त आणि मजबूत ऑर्डर पाइपलाइन आम्हाला दीर्घकालीन मूल्य निर्मितीसाठी सक्षम बनवते.

# ॲक्सिस बँकेतर्फे लॉक एफडी सुविधा सादर

**नागपूर, ५ ऑगस्ट :** भारतातील आघाडीच्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने लॉक एफडी ही एक नाविन्यपूर्ण आणि उद्योगातली पहिली सुविधा सुरू केल्याची घोषणा आज येथे केली. ग्राहकांच्या मुदत ठेवींना वाढत्या डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी ही सुविधा तयार करण्यात आली आहे. बँकेच्या ओपन या मोबाइल ॲपवर आणि सर्व शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध असून, ग्राहकांना मोबाइल किंवा इंटरनेट बँकिंगसारख्या डिजिटल माध्यमांद्वारे मुदत ठेव अकाली बंद करता येऊ नये, यासाठी हे एक अतिरिक्त सुरक्षा कवच देण्यात आले आहे. लॉक एफडी ही सुविधा ग्राहकांच्या मुदत ठेवींना डिजिटल फसवणुकीपासून वाचवण्यासाठी आणलेली एक सुरक्षा यंत्रणा आहे. या सुविधेसाठी निवड करणाऱ्या ग्राहकांना त्यांची मुदत ठेव अकाली बंद करायची असल्यास थेट बँकेच्या शाखेत जावे लागेल. एकदा ठेवीवर लॉक लावल्यास डिजिटल प्लॅटफॉर्मवरून ती बंद करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. ग्राहकांनी बँकेच्या शाखेत जाऊन ओळखीची तपासणी करून घेतल्यावर त्यांच्या मुदत ठेवींवर प्रक्रिया करण्यात येईल. यामुळे त्यांच्या ठेवींमध्ये अनधिकृतरित्या हस्तक्षेप होण्याचा धोका कमी होईल. ही सुविधा विशेषतः अशा ग्राहकांसाठी उपयुक्त आहे, जे डिजिटल प्लॅटफॉर्मचा कमी वापर करतात किंवा ज्यांना अशा माध्यमांतील फसवणुकीचा धोका अधिक असतो.

ॲक्सिस बँकेच्या डिजिटल बिझनेस, ट्रान्सफॉर्मेशन आणि स्ट्रॅटेजिक प्रोग्रॅम्स या विभागांचे ग्रुप एक्झिक्युटिव्ह समीर शेट्टी म्हणाले, ॲक्सिस बँकेत आम्ही डिजिटल उपाययोजनांमध्ये सतत गुंतवणूक करीत असतो. त्यामुळे सुरक्षित आणि अखंड बँकिंगचा अनुभव ग्राहकांना मिळतो. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आम्ही लॉक एफडी ही सुविधा सादर करत आहोत. वाढत्या डिजिटल फसवणुकीला आमच्याकडून दिलेले हे एक खणखणीत उत्तर आहे. या सुविधेमुळे ग्राहकांच्या मुदत ठेवींमध्ये अनधिकृत व डिजिटल हस्तक्षेप होण्यापासून संरक्षण मिळते. ग्राहकांची फसवणूक करून त्यांच्या ठेवींमधील निधी चोरून नेण्याचा चोरट्यांचा मार्ग बंद करून आम्ही ग्राहकांचे पैसे आता अधिक सुरक्षित करू शकतो.

# सॅमसंगकडून भारतात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी व्हिजन एआय टीव्हीवर 'बिग सेलिब्रेशन, बिगर स्क्रिन' ब्लॉकबस्टर डिल्सची घोषणा



**गुरूग्राम, ५ ऑगस्ट :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने स्वातंत्र्य दिनाचा उत्साह साजरा करण्यासाठी देशव्यापी 'बिग सेलिब्रेशन, बिगर स्क्रिन' मोहिमेची घोषणा केली आहे. ही मोहिम १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत रिटेल स्टोअर्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर राबवण्यात येईल, जेथे ग्राहकांना सॅमसंगच्या व्हिजन एआय बिग टीव्हींवरील आकर्षक डिल्ससह मनोरंजन अधिक उत्साहवर्धक करण्याची संधी आहे. सॅमसंगचे व्हिजन एआय असलेले हे टेलिव्हिजन्स उत्साहवर्धक व सर्वोत्तम होम एंटरटेन्मेंटचा आनंद देतात. या टेलिव्हिजन्समध्ये सर्वोत्तम पिक्चर, साऊंड व सानुकूल कन्टेन्ट आहे, जे वापरकर्त्यांच्या पसंतीनुसार डिझाइन करण्यात आले आहेत.

वर्षानुवर्षे सॅमसंग ग्राहकांसाठी सणासुदीच्या काळातील खरेदी उत्साहवर्धक करण्यामध्ये अग्रस्थानी आहे. प्रमोशनचा भाग म्हणून सॅमसंगच्या निओ क्यूएलईडी, ओएलईडी, क्यूएलईडी आणि क्रिस्टल ४के यूएचडी टीव्ही श्रेणीमधील निवडक ५५-इंच व त्यापेक्षा मोठ्या आकाराचे मॉडेल्स खरेदी करणाऱ्या ग्राहकांना जवळपास ९३००० रूपये किंमत असलेला साऊंडबार किंवा जवळपास २०५००० रूपये किंमत असलेला टीव्ही मोफत मिळेल. या ऑफर्स अत्याधुनिक तंत्रज्ञान, सर्वोत्तम व्युइंग आणि अद्वितीय मूल्य देण्याप्रती सॅमसंगच्या सातत्यपूर्ण कटिबद्धतेचा भाग आहेत, ज्यामुळे कुटुंबांसाठी घरी मोठ्या आकाराचा टीव्ही आणण्याची ही परिपूर्ण वेळ आहे.

या मोहिमेबाबत मत व्यक्त करत सॅमसंग इंडियाच्या व्हिज्युअल डिस्प्ले बिझनेसचे वरिष्ठ संचालक व प्रमुख विप्लेश डांग म्हणाले, ''स्वातंत्र्य दिनाला कुटुंबं एकत्र येत उत्साहपूर्ण साजरीकणाचा आनंद घेतात, जेथे संपूर्ण भारतात उत्साहाचे वातावरण असते. 'बिग सेलिब्रेशन, बिगर स्क्रिन' ऑफर्ससह आमचा हा काळ अधिक उत्साहवर्धक करण्याचा मनसुबा आहे, जेथे कुटुंबांना सॅमसंगच्या एआय-पॉवर्ड बिग टीव्हींमध्ये अपग्रेड करण्याची संधी आहे. या टेलिव्हिजन्समध्ये सर्वोत्तम पिक्चर क्वॉलिटी, सिनेमॅटिक साऊंड आणि सॅमसंग व्हिजन एआयद्वारे समर्थित सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत. आम्ही नाविन्यतेमध्ये बाजारपेठेचे नेतृत्व करत असताना आमचे प्रीमियम तंत्रज्ञान अधिक सहजसाध्य करण्याप्रती आणि देशभरातील ग्राहकांसाठी एआय व्युइंग अनुभवाचे लोकशाहीकरण करण्याप्रती कटिबद्ध आहोत.''

अपग्रेडला अधिक किफायतशीर करण्यासाठी सॅमसंगने या मोहिमेअंतर्गत प्रबळ फायनान्स प्रस्ताव सादर केला आहे. ग्राहक निवडक ५५-इंच व त्यापेक्षा मोठ्या आकाराच्या टेलिव्हिजन्सवर फक्त २,९९० रूपयांपासून सुरू होणारे सुलभ ईएमआय आणि जवळपास ३० महिन्यांपर्यंत दीर्घकालीन योजनांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामुळे तडजोड न करता सहजपणे अपग्रेड करता येईल.

# सोनी सब सादर करत आहे, इत्ती सी खुशी सुम्बुल तौकीर खान, वरुण बडोला आणि रजत वर्मा अभिनीत एक हृदयस्पर्शी कौटुंबिक मालिका

**मुंबई, ५ ऑगस्ट :** फील-गुड आणि कौटुंबिक मनोरंजन प्रदान करणारी सोनी सब वाहिनी आता इत्ती सी खुशी ही एक वेधक आणि भावनाप्रधान कौटुंबिक मालिका घेऊन येत आहे, जी सर्व पिढ्यांच्या प्रेक्षकांना नक्की आपलीशी वाटेल. मुंबईच्या पार्श्वभूमीवर बेतलेल्या या मालिकेत २१ वर्षीय अन्विताची गोष्ट आहे, जी आपल्या सहा भावंडांमध्ये सगळ्यात मोठी आहे आणि अनपेक्षितपणे ती आपल्या कोसळणाऱ्या कुटुंबाचा आधार बनली आहे.



अन्विताचे वडील दारूच्या व्यसनाशी झगडत आहेत आणि आई त्यांना सोडून गेली आहे. अशा वेळी अन्विताच आपल्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवते आहे. आपल्या भावंडांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तिने स्वतःचे शिक्षण आणि आशा-आकांक्षा बाजूला सारल्या आहेत. तिचा दैनंदिन अस्तित्वाचा संघर्ष, मूक बलिदान आणि तिच्यातील प्रेम आणि चिकाटी या मालिकेत हलक्या-फुलक्या स्वरूपात बघायला मिळेल. वरुण बडोला ६ वर्षांनी पुन्हा टेलिव्हिजनवर परतत आहे. तो या मालिकेत सुहास हा अन्विताच्या बेकार पित्याच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याच्या सोबत मालिकेत प्रमुख भूमिकेत आहेत सुम्बुल तौकीर खान (त्याच्या मुलीच्या- अन्विताच्या भूमिकेत) आणि आणि रजत वर्मा (अन्विताचा प्रियकर विराटच्या रूपात) आहेत. मालिकेच्या मोठमोठ्या क्रू सदस्यांमध्ये एक नाव आहे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता दिग्दर्शक राजेश मापुस्कर यांचे. या मालिकेसाठी क्रिएटिव्ह फोर्स म्हणून त्यांना घेण्यात आले आहे.

रोझ ऑडिओ व्हिज्युअल्स द्वारा निर्मित इत्ती सी खुशी हे शेमलेस या प्रसिद्ध मालिकेचे भारतीय रूपांतरण आहे. शेमलेस ही मुळात कंपनी पिक्चर्स आणि यूके चा लेखक पॉल अबॉट यांनी अधिकार धारक ऑल३मीडिया इंटरनॅशनल यांच्या सहयोगाने विकसित केलेली मालिका आहे. ही मूळ मालिका चॅनल४ वर गाजली होती, तिला बाफ्टा टीव्ही अवॉर्ड्समध्ये बेस्ट ड्रामा सिरीज या पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले होते. त्याच्या अमेरिकन आवृत्तीला देखील खूप वाखाणण्यात आले होते. या मालिकेने अनेक प्राइम-टाइम एमी नामांकने आणि चार पुरस्कार पटकावले होते. यूके आणि युएस च्या या दोन्ही रूपांतरणात आकर्षक आणि प्रतिभावान अभिनेत्यांचा संच होता.

# विनोदी मालिका 'घरवाली पेडवाली' मध्ये निहारिका रॉय सावीच्या भूमिकेत!



**मुंबई, ५ ऑगस्ट :** एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' भावना, हास्य आणि भयावह सरप्राइजेजच्या धमाल रोलरकोस्टरचे मनोरंजन देण्यास सज्ज आहे. या नवीन संकल्पनेमध्ये अधिक मोहकतेची भर करत आहे उत्साही व प्रतिभावान निहारिका रॉय, जी उत्साही, धाडसी, फॅशन-फॉरवर्ड जनरेशन झेड गर्ल सावीची भूमिका साकारणार आहे. या असामान्य प्रेम त्रिकूटामधील 'घरवाली' म्हणून तिची उपस्थिती अनपेक्षितपणे कथानकाला रोमांचक वळण देते. विनोदी व प्रेमळ निहारिका दीर्घकालीन छाप निर्माण करण्यास सज्ज आहे. सावी भूमिकेबाबत सांगताना निहारिका रॉय म्हणाली, ''सावी फक्त भूमिका नाही तर पूर्णतः नवीन उत्साह घेऊन येते. ती आजची तरूण, आत्मविश्वासूवस्वावलंबी मुलींचे प्रतिनिधीत्व करते, ज्या नीडरपणे आपले जीवन जगतात. टेलिव्हिजनवरील इतर महिला पात्रांच्या तुलनेत ती अधिक नीडर व अभिव्यक्त होणारी आहे, जे मला खूप आवडले आहे. तिला इतरांपेक्षा वरचढ ठरवणारी बाब म्हणजे आधुनिक दृष्टिकोन, भावनिक परिपक्वता आणि लहान शहरामधील सौंदर्य यांचे उत्तम संयोजन. मला वास्तविक जीवनात देखील खूप धमाल करायला आवडते, ज्यामुळे सावीच्या भूमिकेमध्ये सहजपणे सामावून जाता येते. ही भूमिका माझ्यासाठी उत्साहवर्धक व अर्थपूर्ण आहे.''



## आज का अंदाज

बुधवार ६ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ३७० | ३८० | ७८९ | ३७७ | १३९ | ४५६ | १६९ | १२६ |
| ४६० | ४७० | २४८ | ४६७ | २३८ | २३० | १५० | २८९ |
| २८० | ५६० | ३४७ | ५५७ | ३३७ | ३३७ | ११४ | ४७८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३८ | ५८ | ६१ | ९१ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३७ | ५७ | ६० | ९० |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३४ | ५४ | ६२ | ९२ |

**६ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ६१ | ५३ | ९३ |
| २४ | ६४ | ५८ | ९८ |
| २७ | ६७ | ५० | ९० |
| ६७९ | ६०० | ६९० | ९०० |
| २४६ | ७९० | २६७ | २३४ |
| १२९ | ८८० | ३५७ | १९९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# झी टीव्हीच्या कलाकारांनी सांगितल्या त्यांच्यासाठी खास असलेल्या मैत्रीच्या गोष्टी



**मुंबई, ५ ऑगस्ट :** फ्रेंडशिप डे हा आपल्या जीवनात आनंद, आधार आणि अर्थ घेऊन येणाऱ्या नात्यांची आठवण करून देणारा एक हृदयस्पर्शी दिवस आहे. हे त्यांचे सेलिब्रेशन आहे जे आपल्या प्रत्येक चढ-उतारामध्ये आपल्यासोबत ठामपणे उभे राहतात एकटेपणाची भावना थोडीशी कमी करतात. मग ती बालपणीची, ऑफिसमधली सोबत असो, किंवा अगदी अलीकडे जुळलेली ती जिव्हाळ्याची ओळख प्रत्येक मैत्री जीवनाच्या कॅनव्हासला स्वतःचा एक खास रंग देते. या वर्षी, झी टीव्हीवरील कलाकार सरूमधील अनुष्का मर्चंडे, वसुधामधील अभिषेक शर्मा, तुम से तुम तक मधील निहारिका चौक्सी, जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराणा, छोरियाँ चली गाँव मधील ऐश्वर्या खरे, आणि जमाई नं. १ मधील अभिषेक मलिक यांनी त्यांच्या आयुष्यातील मैत्रीचे महत्त्व आणि त्यांच्या मनात खोलवर घर करून बसलेल्या आठवणी शेअर केल्या.

झी टीव्हीच्या 'छोरियाँ चली गाँव' या मालिकेतील अभिनेत्री ऐश्वर्या खरे म्हणाली, मैत्री म्हणजे एकत्र वाढणे आणि एकमेकांसाठी सुरक्षित जागा बनणे. मला त्या दोघी बहिणींच्या रूपात दोन बेस्ट फ्रेंड्स मिळाल्या आहेत, ज्या माझ्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनच माझ्यासोबत आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला एका जुन्या मित्राची भेट होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. कोणत्याही स्पर्धेत किंवा परीक्षेत तुम्हाला यश आणि आदर मिळेल. एका नवीन औद्योगिक युनिटचे उद्घाटन होईल.

**वृषभ :** आज, प्रतिस्पध्यार्शी किंवा शत्रूशी लढाई संपेल. आणि पुन्हा सुसंवाद निर्माण होईल. कौटुंबिक मित्रासोबत व्यावसायिक संबंध सुरू होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी अनुभवाचे कौतुक केले जाईल.

**मिथुन :** आजचा दिवस विशेष आनंद आणि प्रगतीचा राहणार नाही. महत्त्वाच्या कामात संघर्ष वाढू शकतो. सामाजिक कार्यात संयमाने वागा. विरोधक तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करू शकतात.

**कर्क :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी विशेष सहकार्य आणि आदर मिळेल. काही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळाल्याने तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसायात नफा कमावण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आज तुमच्या मुलांप्रती असलेली जबाबदारी पार पडेल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. कामाच्या ठिकाणी तुमचे बौद्धिक कौशल्य पाहून सर्वांना आश्चर्य वाटेल.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी जवळच्या व्यक्तीशी तुमची जवळीक वाढेल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. लोक तुमच्याकडे आकर्षित होतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम करूनही तुम्हाला सारखे परिणाम मिळणार नाहीत. सहकाजयांशी मतभेद होऊ शकतात. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. तुम्हाला सरकारी योजनेचा लाभ मिळेल.

**वृश्चिक :** आज, कामाच्या आणि व्यवसायाच्या क्षेत्रात तुमच्या समस्यांना गांभीयार्ने तोंड देण्यासाठी तयार राहा. घाबरू नका. संघर्षानंतर महत्त्वाच्या कामात तुम्हाला यश मिळेल. जुन्या मित्रांची भेट होईल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी सकारात्मक असेल. प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. शत्रू तुमच्याशी स्पर्धेची भावना बाळगतील. प्रकृतीकडे अधिक लक्ष पुरवा.

**मकर :** आज तुम्हाला तुमच्या कारकिर्दीला नवीन दिशा देण्यासाठी अनेक उत्तम संधी मिळतील. कृषी क्षेत्रात तुम्हाला काही नवीन संधी मिळतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना मान मिळेल.

**कुंभ :** आज तुम्हाला कुटुंबात काही चांगली बातमी मिळेल. सरकारी मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. तुम्हाला परीक्षा आणि स्पर्धांमध्ये यश मिळेल. कौटुंबिक जीवन आनंददायी राहील.

**मीन :** शिक्षण, अर्थशास्त्र आणि कृषी क्षेत्रात काम करणाजया लोकांना फायदेशीर संधी मिळतील. विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. व्यवसायात नवीन भागीदार मिळतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८४



**आडवे शब्द :-**
१) सत्तेवर असणाऱ्या माणसाची हांजी हांजी करणारे नीच लोक
८) जेमतेम
११) एक दागिना
१२) माणूसकी
१४) एक चर्मवाद्य
१७) गीत
१९) नवऱ्या मुलीची बहीण
२१) एका किल्ल्याचे नाव
२४) कर्णेंद्रिय
२५) बासरी
२६) बगळा
२७) वारी करणारा
२९) इच्छा
३०) मन, विचार, मानलेला
३१) वर्ष, साल
३२) भांडण, चर्चा
३३) मकबरा
३५) मीठाची चव
३७) दारूबाज, छचोर
३८) चामखीळ
४१) मोठी नदी
४२) सिद्धता
४४) एखादी गोष्ट पूर्ण करण्याचे मनापासून ठरविणे
४६) मान्यतेचा शब्द
४७) हिन्दुस्थानी
४९) मोठा नगारा
५०) आईचा भाऊ
५२) सिनेमा
५४) एक रत्न
५५) शपथ
५७) श्रीरामाचे एक नाव
५८) महादेव
६०) वयाने जास्त असलेला
६२) पार्वतीचे एक नाव
६३) चित्र काढणारा
६५) नमूना
६७) लाज
६८) परतफेड
६९) बोललेले
६९) आकाशयान
७०) खाण्याची तंबाखू
७१) एकागे नजर
७३) सत्यनारायणाचा गोड पदार्थ
७४) गीतातील शब्दालंकार
७६) विवाहविच्छेदाची मुस्लीम पद्धती
७७) फालतू, किरकोळ सामान
७८) शर्थीचे प्रयत्न

**उभे शब्द :-**
१) त्वरित
२) टांगा, रथ यांना ओढणारा प्राणी
३) व्रत
४) धोबी
५) गाय
६) समाजातील प्रतिष्ठा, एक अवयव
७) छावा, बच्चे
९) छाया
१०) सुनेला सासरी होणारा छळ
१३) चंद्र
१५) तफावत
१६) लाकडाची एक जात
१८) ज्यात जहर आहे असे
२०) अरण्य
२२) भीती
२३) ठेकेदार
२५) पर्ण
२८) कथा सांगणारा, कीर्तनकार
३०) पुढेच्या विरुद्ध
३१) मोठी उथळ वाटी
३४) बेडकांचे ओरडणे
३६) दात
३७) फोटो
३९) वेळ
४०) प्रेक्षक, बघणारे
४३) मयूर
४५) दारूचा एक प्रकार
४७) स्तुती करणारा
४८) धनुष्यबाण
५१) दुर्भिक्ष, चणचण
५२) चिमण्यांच्या आवाजांचा गोंधळ
५३) परकीय, आपला नसलेला
५५) सूर्याचे एक नाव
५६) मनोरंजन
५९) द्रवपदार्थ
६१) यश मिळवून देणारा
६२) हजर
६४) ख्रिश्चनांचा प्रार्थनेचा दिवस
६६) लाजणारा
७२) सत्वांश
७३) रक्तवाहिनी
७५) झकास

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# श्रीक्षेत्र धारगड यात्रेनिमीत शिवभक्तांना जाहीर आवाहन

**अकोला :** ,सातपुड्याच्या दुर्गम डोंगराळ भागात पुरातन गुफा शेंकडो वर्षाची परंपरा असलेल्या श्री क्षेत्र धारगड येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी भव्य यात्रेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते यावर्षी हि यात्रा दिनांक १०ऑगस्ट २०२५ रविवारी सकाळी ६ वाजतापासून ते ११ऑगस्ट सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंत राहणार आहे दर्शन व जलाभिषेक करण्यासाठी शिवभक्तांना प्रवेश मिळणार आहे.,श्री क्षेत्र धारगड यात्रेत पायदळ मार्ग शिवपुर-कासोद पर्यंत बससेवा सुरु राहील पायदळ अमोना मार्गे धारगड गुफा शिवलिंग दर्शन,ते नरनाळा किल्ला हनुमान मंदिर येथे महाप्रसाद व्यवस्था नरनाळा सेवा समितीकडून करण्यात आली आहे नरनाळा किल्ला ते शहानुर पायदळ येऊन शहानुर येथुन अकोट करीता बससेवा उपलब्ध आहे, मोटरसायकल व चारचाकी वाहनाने अकोट पोपटखेड मार्गे खटकाली गेट वनविभागाचा तपासणी नाक्यावरुन श्री क्षेत्र धारगड टी पॉईट पर्यत मोटरसायकल व चारचाकी खाजगी वाहनांना प्रवेश देण्यात येणार असून यासाठी पार्कीग शुल्क लागणार आहे यांची शिवभक्तानी नोंद घ्यावी., यात्रे दरम्यान प्लॅस्टिकची पाणी बोटल धारधार शस्त्र तसेच माचीस बिडी, सिगरेट,तंबाखू देशी-विदेशी दारु सर्व प्रकारचे नशापान पुर्णपणे बंदी घालण्यात आली आहे तरी शिवभक्तांनी अकोट वन्यजीव वनविभागाच्या वरील सर्व अटी- नियमाचे काटेकोर पणे पालन करून श्री क्षेत्र धारगड यात्रेत सहभागी व्हावे हि विनंती तरी सर्व शिवभक्तांनी वन्यजीव वनविभाग अकोट तसेच चिखलदारा अकोट पोलीसांना सहकार्य करावे अशी विनंतीविश्व हिंदू परिषद बजरंग दल द्वारा प्रेरीत धारगड भंडारा सेवा समीती अकोट ता.अकोट जि.अकोला

# अकोल्याच्या विकासाला गती!

## खासदार अनुप धोत्रे यांच्या पाठपुराव्यामुळे रेल्वेमंत्र्यांचा मोठा निर्णय

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

अकोल्याच्या विकासाला गती देण्यासाठी खासदार अनुप धोत्रे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. रेल्वे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात आणि अकोलेकरांचे जीवनमान सुधारावे यासाठी खासदार धोत्रे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर रेल्वेमंत्र्यांनी तात्काळ दखल घेत,रेल्वे मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन अकोल्यातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.



अकोलेकरांसाठी सर्वात आनंदाची बातमी म्हणजे, लवकरच सुरू होणाऱ्या पुणे- नागपूर वंदे भारत एक्सप्रेसला अकोल्यात थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खासदार अनुप धोत्रे यांनी या गाडीला अकोल्यात थांबा देण्याची जोरदार मागणी केली होती, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ यांना जलद कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.अकोला-अकोट रस्त्यावरील दूर वाहतुकीची समस्या करण्यासाठी अकोट फैल येथे उड्डाणपूल बांधण्याची मागणी अनेक दिवसांपासून होती. मध्य रेल्वेच्या भुसावळ डिव्हिजनने यासाठी ३३.५० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रस्तावावर सकारात्मक भूमिका घेत, तांत्रिक बाबींची तपासणी करून लवकरच मंजुरी देण्याचे

आदेश दिले आहेत. यामुळे अकोलेकरांची जुनी मागणी पूर्ण होणार आहे. या बैठकीत अकोला रेल्वे स्थानकाच्या विस्तारीकरणावर आणि नूतनीकरणावरही चर्चा झाली.रेल्वेमंत्र्यांनी या संदर्भातील योजनांना गती देण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, उत्तर प्रदेशमधील प्रयागराज, अयोध्या आणि काशी येथे जाणाऱ्या गाड्या सुरू करण्याची मागणीही खासदार धोत्रे यांनी केली आहे.

खासदार अनुप धोत्रे यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या तत्परतेमुळे अकोल्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रकल्प मार्गी लागले आहेत. याबद्दल खासदार धोत्रे यांनी रेल्वेमंत्र्यांचे आणि अकोला लोकसभा मतदारसंघातील २० लाख मतदारांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत. अकोल्याच्या विकासाला नवी दिशा देणारे हे निर्णय महत्त्वाचे ठरतील, अशी आशा व्यक्त होत आहे.

# ॲड. निलेश हेलोंडे यांचा जिल्हा दौरा

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे हे दि. ७ ऑगस्ट रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे.

गुरूवार, दि. ७ ऑगस्ट रोजी शेगावहून स. ११ वा. बाळापूर विश्रामगृह येथे आगमन व तहसूलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना भेट, तद्नंतर चारा लागवडी ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी १ वाजता पातूर जि. अकोलाकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता पातूर विश्रामगृह येथे आगमन व शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा व राखीव. दुपारी ३ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट.

तद्नंतर तहसिलदार पातूर यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. सायंकाळी ६ वाजता सोयीनुसार अमरावती मार्गे काटोलकडे प्रयाण.

# कुटासा आरोग्य उप केंद्राची जुनी इमारत पाडा अन जीवितहानी टाळा :शाम राऊत

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

कुटासा हे गांव अंदाजे १० हजार लोकसंख्येचे असून येथील सामान्य लोक आरोग्य उपकेंद्र कुटासा येथे अंदाजे दररोज १०० ते २०० रूग्ण सेवा घेत असतात. परंतु सदर ईमारत ही इतकी जिर्ण झाली आहे की त्याचा प्रत्येक पावसाळ्या मध्ये स्लॅब चा मलबा थोडा थोडा कोसळतो आहे. ही ईमारत अनेक वर्षे जुनी असून आज रोजी येथे आरोग्य सेवा देण्या योग्य ही ईमारत मुळीच नाही. सदर आरोग्य उपकेंद्रा करीता सन २०१६ पासून निधीची तरतूद शासनानी केली असून या जिर्ण झालेल्या ईमारतीची निविदा तथा वर्कऑर्डर होवून बांधकाम निधी मंजूर झाल्यावर आजपर्यंत हि कामाला सुरूवात झालेली नाही. सन २०१६ पासुन ते आजपर्यंत सतत निवेदन देवून जिल्हाआरोग्य अधिकारी व विभागास कळिवले आहे. परंतु यावर कुठलीच कार्यवाही न झाल्या मुळे सामान्य जनतेचे व तेथील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे जिव धोक्यात आहे. या विषयी गंभीर दखल घेवून तात्काळ सदर ईमारतीकरीता भरीव निधी उपलब्ध करून द्यावा व तात्काळ नविन ईमारतीचे बांधकाम करण्यात यावे.



या बाबत केलेला पाठपुरावा, अनेक वर्षापासून जिल्हा आरोग्य अधिकारी अकोला यांना दिलेली निवेदने याची दखल आरोग्य विभागाने अजीबात घेतलेली नाही. सदर पडक्या ईमारतीमुळे जर जिवित हानी झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी हि आरोग्य विभागातील संबधित अधिकाऱ्यांची राहणार याची कृपया नोंद आरोग्य विभागाने घ्यावी. यावर कार्यवाही एका आठवड्यात न झाल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल तेव्हा निर्माण होणारी कायदा व सुव्यस्थेची गंभीर परिस्थिती व खाजगी मालमत्तेच्या होणाऱ्या नुकसानास आपला विभाग सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घेण्यात यावी. अशा आशया चे आज जिल्हा आरोग्य अधिकारी अकोला यांना निवेदन श्याम राऊत यांच्या वतीने देण्यात आले यावेळी सोपान भाऊ कुटाळे, निलेश भाऊ ठोकळ, विठ्ठल जी वाघ, कुणाल जाधव, गोपाल पोहरे, अमोल माळी, सोपान सारसे ई उपस्थीत होते.

# जिल्हा शल्यचिकित्सक,अधीक्षक,प्रशासकीय अधिकारी यांच्या वर गुन्हे दाखल करा

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता विभागासाठी सनब २०२४-२५ मध्ये ३१ पदांसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत गंभीर अपारदर्शकता आणि नियमबाह्य पध्दतीचा अवलंब करून झाल्याचा अहवाल समोर आला आहे. डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा शल्यचिकित्सक अकोला, डॉ. जयंत पाटील जिल्हा अधिक्षक, जि. स्त्री. रुग्णालय, अकोला व अधिक्षक ए.एन. डांबरे प्रशासकिय अधिकारी, जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला यांनी सदर ई-निविदा प्रक्रियेत आपल्या पदाचा दुरूपयोग करून



संबंधित कंत्राटदाराकडुन प्रचंड प्रमाणात पैसे घेवुन मर्जीतीलच कंत्राटदाराला सदर कंत्राट दिले असे चौकशी दरम्यान निदर्शनास आले.तरी डॉ. तरगंतुषार वारे, डॉ. जयंत पाटील व ए.एन. डांबरे या निलंबीत अधिका-यांवर शासनाची व जनतेची फसवणुक केल्याप्रकरणी त्यांची सखोल चौकशी करून ताबडतोब गुन्हा दाखल करण्यात यावा. अन्यथा संघटनेच्यावतीने तिव्र प्रकारचे आंदोलन छेडण्यात येईल. अशी मागणी जिल्हाधिकारी यांना फुले आंबेडकरी राष्ट्रीय विद्यार्थी युवक संघटनाच्या वतीने दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी फुले आंबेडकरी राष्ट्रीय विद्यार्थी युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र भोजने, सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे, उल्हास सरदार, संतोष ढोले, संजय वानखडे, श्रीकांत खेडकर आदि निवेदन देतेवेळी उपस्थित होते. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या (लेडी हार्डिंग रुग्णालय) नवजात शिशू अतिदक्षता विभागात भरती प्रक्रियेसाठी निविदा प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने राबविण्यात आल्याचा ठपका ठेवत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. श्रीमती तरंगतुषार वारे, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक जयंत पाटील व प्रशासकीय अधिकारी ए. एन. डांबरे या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपसंचालक कार्यालयाने गुन्हे दाखल न करता फक्त निलंबित करुन पाठराखण केली आहे.

# मृतक अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे रेल्वे पोलिसांचे आवाहन

**अकोला :** ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी अंदाजे १०.१५ वाजता अकोला रेल्वे स्थानकाच्या यार्डजवळील कि.मी. नं ५८४ / २६ येथे एक अनोळखी पुरुष व्यक्ती ( वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष) याने गाडी क्र. ११०३९ समोर उडी घेऊन आत्महत्या केली. लोको पायलटने ही माहिती रेल्वे पोलीसांना दिली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस स्टेशन अकोला येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून प्रेत शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. मयताचे वर्णन : उंची ५ फूट ५ इंच, निमगोरा रंग, मजबूत बांधा, काळे-पांढरे वाढलेले केस व दाढी मिशी,सदर मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना राबविण्यात येत असून, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक संचालक डॉ. अनिता राठोड यांनी केले.योजनेसाठी १७ ऑगस्टपर्यंत अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत आहेत. इयत्ता १२ वीनंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लाभ मिळू शकेल. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या, आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहामध्ये विना मूल्य प्रवेश मिळालेला नसावा.योजनेत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्ता या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांचे आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात येते. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. सक्षम प्राधिका-याने दिलेला जातीचा दाखला. विद्यार्थी अनाथ असल्यास महिला व बाल कल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र. विद्यार्थी दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र आवश्यक, विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. आधार क्रमांक राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न हवा. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा. विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. विद्यार्थ्यांना किमान ६० टक्के गुण व दिव्यांगास ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. वय ३० वर्षपेक्षा अधिक नसावे. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

# साहित्य अकादमीचे बाल साहित्य व युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी आवाहन पुस्तकांच्या नोंदणीला सुरुवात

अकोला : साहित्य अकादमीने बाल साहित्य पुरस्कार २०२६ आणि युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी पुस्तकांची नोंदणी सुरू केली आहे. अकादमीने मान्य केलेल्या २४ भारतीय भाषांमधील लेखक, प्रकाशक तसेच साहित्यप्रेमींना आपली पुस्तके पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बाल साहित्य पुरस्कार २०१० पासून दरवर्षी २४ भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट बालसाहित्य निर्मितीसाठी दिला जातो. मराठीसह, आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मीरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगु आणि उर्दू या भाषांमध्ये लिहिलेली पुस्तके विचारात घेतली जातील.पुस्तके ९ ते १६ वयोगटातील मुलांना लक्षात घेऊन लिहिलेली असावीत आणि ती १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत पहिल्यांदाच प्रकाशित झालेली असावीत. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ आहे. २०११ पासून सुरू झालेल्या युवा साहित्य पुरस्काराचा उद्देश ३५ वर्षांखालील तरुण लेखकांना प्रोत्साहन देणे हा आहे. १ जानेवारी २०२६ पर्यंत लेखकाचे वय ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. अर्जदाराने प्रत्येक पुस्तकाच्या दोन प्रती तसेच जन्मतारखेचा पुरावा (आधार कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदार कार्ड) स्व-प्रमाणित प्रतीसह पाठवावा. पुस्तक सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे.बाल आणि युवा पुरस्कार स्वरूपात ५०,०००/- रूपये रोख, ताम्रपट आणि प्रशस्तीपत्र प्रदान केले जाईल. साहित्य अकादेमीच्या संकेतस्थळावर (www.sahityaakademi.gov.in) पुरस्कारासंबंधी सर्व नियम आणि सविस्तर माहिती उपलब्ध आहे.

# आगर गाव चे विद्यार्थी व सामान्यांची पडक्या पुलामुळे कार्यकारी अभियंत्याकडे धाव !



▪**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

आगर गाव चे विद्यार्थी व सामान्यांची पडक्या पुलामुळे कार्यकारी अभियंत्याकडे धाव ! आगर गावा नजीक असलेल्या चिचखेडा नाल्यामुळे गावची एसटी बस सेवा बंद आहे .शाळेत जाणाऱ्या विद्यार्थी मुला-मुलींना फार त्रासाचा सामना करावा लागत असल्याने तथा खाजगी वाहने सुद्धा मुबलक मिळत नसल्याने समस्या बिकट झाली आहे .सदर शाळकरी मुला-मुलीं ना महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ अकोला कडून बस सेवेसाठी मासिक पास काढलेले आहेत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच खाजगी वाहनांमध्ये आगर ते अकोला प्रवास हा भाडे ८० रुपये ते शंभर रुपये असल्याने हा खर्च सामान्य विद्यार्थी गोरगरीब विद्यार्थी यांना झेपत नाही सदर विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती खूप बिकट असल्यामुळे तथा त्यांचे आई-वडील हे शेतकरी शेतमजूर असल्याने जी मोलमजुरी मिळते ती खूप कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे सदर खर्च हा झेपावणारा त्या विद्यार्थ्यांना मुळीच नाही.

# विद्यार्थ्यांच्या हस्ते विक्रमी शाडू माती गणेशमूर्ती कार्यशाळा!

## विजेत्यांच्या मूर्ती चिखलदरा संग्रहालयात कायमस्वरूपी!

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

अकोल्यात या वर्षीचा 'अकोला महोत्सव २०२५' एक वेगळीच सामाजिक आणि पर्यावरणपूरक ओळख निर्माण करत आहे. 'निलेश देव मित्र मंडळ' आणि 'ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प' यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा परिषद, महानगरपालिका व राज्य शासनाच्या सहकार्याने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



हा महोत्सव केवळ एक सांस्कृतिक सोहळा न राहता पर्यावरण संरक्षण, सामाजिक जाणीव आणि युवकांसाठी रोजगार संधी यांचे त्रिसूत्री साधणारा एक ऐतिहासिक, मार्गदर्शक उपक्रम ठरत आहे. या महोत्सवातील मुख्य आकर्षण म्हणजे १० टन शुद्ध शाडू माती कोकणातील पेन येथून अकोल्यात आणली गेली आहे. या मातीचा उपयोग ५० हून अधिक शाळांमधील तब्बल १०,००० विद्यार्थ्यांसोबत १६ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज मैदान, तापडिया नगर येथे होणाऱ्या भव्य गणेशमूर्ती कार्यशाळेत केला जाणार आहे.ही कार्यशाळा जगातील सर्वात मोठी शाळकरी शाडू माती गणेशमूर्ती कार्यशाळा ठरण्याची दाट शक्यता आहे! या कार्यशाळेतील उत्कृष्ट मूर्तींची निवड करून, त्या 'नंद गणपती संग्रहालय, चिखलदरा' येथे आयुष्यभरासाठी जतन केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कौशल्याला व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलाकृतींना राष्ट्रीय ओळख मिळावी यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.

झजझ मूर्तींमुळे पर्यावरणावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता, या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी शाळांमध्ये प्रबोधन मोहीम राबवली जात आहे.विशेष आकर्षण: १० वर्षांची बाल पर्यावरण कार्यकर्ती कु. पूर्वा बगळेकर हीदेखील उपस्थित राहणार आहे.

# श्रीकृष्ण लीलामृत सप्ताहाचे आयोजन

▪**अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**



श्री संत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे दि.९ . ८. ते १६ . ८ . २०२५ पर्यंत जगद्गुरु भगवान गोपाल कृष्ण जन्माष्टमी , भगवान श्री ज्ञानोबारायांच्या सप्तशतकोत्तर (७५०) सुवर्ण महोत्सवी अवतिर्णोत्सव तथा ज्ञानेश आश्रमाच्या तेरावा वर्धापन दिन या त्रिविध कार्याचे औचित्य साधून वार्षिक नियमाप्रमाणे ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामूहिक पारायण तसेच भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या अमृततुल्य वाणीतून श्रीकृष्ण लीलामृत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहामध्ये रोज पहाटे ५ ते ६ काकडा आरती ७ ते ८ विष्णुसहस्त्रनाम , गोपी गीत , भ्रमर गीत पठण , सकाळी ९ ते १ सामूहिक पारायण , दुपारी ३ ते ५ श्रीकृष्ण लीलामृत ( श्री गर्ग संहिता आधारित ) प्रवचन , संध्याकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्रौ ८ ते १० ज्ञानेश्वरी भावनिरूपण कथेचे छोटे खाणी आयोजन केले आहे. असे भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळिवतात.

# अनाधिकृत बॅनरवर मनपा अतिक्रमण विभागाव्दारे निष्कासनाची कारवाई



▪**अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :**

आज दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका पश्चिम झोन अंतर्गत जयहिंद चौकातील बिना परवानगी ने लावण्यात आलेले बॅनरवर मनपा अतिक्रमण विभागाव्दारे निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच नेकलेस रोडवरील अतिक्रमणे काढण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे यांचेसह मनपा अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांचा समावेश होता.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)




# जिभेचा रंग सांगतो आजारपण

वाचा तर खरं

डॉ. कुंदन गायकवाड

आपण आजारी पडतो, तेव्हा डॉक्टर प्रथम आपली जीभ तपासतात. कारण जीभ आपल्या शरीराच्या आरोग्याबाबतही बरेच काही संकेत देत असते. विशेषतः आयुर्वेदात जिभेचा रंग शरीरात होणाऱ्या अंतर्गत बदलांची माहिती देतो, असे मानले जाते.



जिभेचा रंग पिवळा, लाल, निळा किंवा फिकट दिसत असेल किंवा जिभेवर काही खुणा असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

**पिवळी जीभ**

जीभ पिवळी दिसत असेल तर ते शरीरात पित्त दोष वाढणे, आम्लता किंवा पित्त रसाचे असंतुलन यांचे लक्षण असू शकते. या स्थितीत प्रत्येक जेवणानंतर पाच तुळशीची पाने आणि एक वेलची चावणे फायदेशीर असते. ते पित्त शांत करते आणि पचनासदेखील मदत करते.

**फिकट जीभ**

जीभ खूप फिकट किंवा पांढरी दिसत असेल तर ते हिमोग्लोबिनची कमतरता, अशक्तपणा दर्शवू शकते. अशा परिस्थितीत सकाळी भिजवलेले अंजीर आणि थोडा गूळ खाणे खूप फायदेशीर असते. यामुळे रक्ताचे प्रमाण वाढण्यास मदत होते आणि शरीराला ऊर्जा मिळते.

**जीभेच्या कडा किंवा टोक लाल**

जिभेच्या कडा किंवा टोक लाल दिसत असतील तर ते मानसिक ताण, हृदय किंवा हार्मोनल बदलांचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत रात्री उशीजवळ गुलाबाच्या पाकळ्या, ब्राम्ही आणि लैव्हेंडरची एक छोटी पुरचुंडी ठेवून झोपा. यामुळे मनाला शांती मिळते आणि चांगली झोप येण्यास मदत होते.

**निळी किंवा जांभळी जीभ**

हा रंग शरीरात रक्तप्रवाह कमी झाल्यामुळे, ऑक्सिजनची कमतरता किंवा जास्त ताणामुळे येऊ शकतो. अशा परिस्थितीत दिवसातून १० मिनिटे अनुलोम-विलोम प्राणायाम करा आणि रात्री १ चमचा हळद मिसळून कोमट दूध प्या. यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो.

**गुलाबी जीभ**

तुमची जीभ गुलाबी आणि स्वच्छ असेल तर ते चांगले पचन आणि संतुलित दोषांचे लक्षण आहे. याचा अर्थ तुम्ही योग्य आहार आणि जीवनशैलीचे पालन करत आहात. तरी शरीराच्या ऊतींचे पोषण करण्यासाठी रात्री एक चमचा देशी तूप घ्या.

# वाईट सवयींचं किडनी विकाराला निमंत्रण

व्याधी विचार

डॉ. प्रसन्न नेने



किडनी हा शरीराची सफाई करणारा फिल्टर आहे. तो रक्त साफ करून शरीरातील टॉक्सिन्स आणि निरुपयोगी घटक मूत्रावाटे शरीराच्या बाहेर टाकतो. रक्तदाब नियंत्रित करणे, शरीरातील पाणी आणि खनिजांचे संतुलन राखणे, ड जीवनसत्वाला सक्रीय करणे अशी आवश्यक काम करीत असतो.

आपल्या काही सवयी हळूहळू किडनीचे नुकसान करतात. परंतु ते आपल्या लवकर लक्षात येत नाही. या सवयी वेळीच सुधारल्या नाहीत तर क्रॉनिक किडनी डिसिज वा किडनी फ`ल्युअरसारखी गंभीर परिस्थिती उद्भवू शकते. रोजच्या अशा १० सवयी वेळीच बदलल्या तर किडनीचे आरोग्य सुधरू शकते.

**वारंवार पेन किलर घेणे**

दुखण्यासाठी किंवा ताप येणे का आयबुप्रोफेन वा एस्पिरिन गोळ्या खाणे सर्वसामान्य मानले जाते. परंतु जास्त प्रमाणात ही औषधे घेणे किडनीत रक्ताचा पुरवठा कमी करतात. हळूहळू किडनीचे नुकसान होऊ लागते. तुम्हाला किडनीचा कोणताही आजार असेल तर डॉक्टरांना न विचारचा पेन किलर अजिबात खाऊ नका.

**जास्त खारट पदार्थ खाणे**

मीठ म्हणजेच सोडियमच्या जास्त सेवनाने उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो आणि त्यामुळे किडनीचे मोठे नुकसान होते. यामुळे जेवणात वरून मीठ घालण्या ऐवजी लिंबू, धणे, आले वापरा. पॅकबंद आणि जंकफूडमध्ये जास्त सोडीयम असते. त्यांचा वापर कमी करा.

**कमी पाणी पिणे**

किडनीचे काम नीट होण्यासाठी योग्य प्रमाणात पाणी प्यायला हवे. तुम्ही कमी पाणी पीत असाल तर शरीरातील टॉक्सिन्स एकत्र होतात. त्यामुळे किडनीवर दबाव वाढतो आणि स्टोन तयार होण्याची शक्यता वाढते. दिवसभरात ६ ते ८ ग्लास पाणी पिणे चांगले मानले जाते.

**जास्त प्रोसेस्ड फूड खाणे**

फास्ट फूड, पॅकींगमधील पदार्थ वा रेडी टू इट पदार्थांत साखर आणि केमिकलचे प्रमाण जास्त असू शकते. तसेच फायबर आणि पोषक तत्वांचे प्रमाण कमी असते. या सवयीमुळे केवळ किडनीलाच नव्हे, तर शरीराच्या इतर भागालासुद्धा त्रास होतो. रोजच्या आहारात फळे, हिरव्या भाज्या आणि घरच्या जेवणाचा समावेश करा.

**पुरेशी झोप न घेणे**

संशोधनात असे स्पष्ट झाले आहे, की सहा तासांहून कमी झोपण्याने उच्च रक्तदाब आणि किडनीशी संबंधित आजारांचा धोका जास्त असतो. यासाठी दिवसातून ७ ते ८ तास झोप घेणे गरजेचे असते.

**जास्त प्रोटीन घेणे**

हाय प्रोटीन डाएट म्हणजे रेड मीट वा जास्त प्रोटीन स्रोतामुळे किडनीवर दबाव येतो. कारण किडनीला जास्त टाकाऊ पदार्थांना गाळावे लागते. किडनी कमजोर असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रोटीनचे सेवन करावे.

**जास्त साखर खाणे**

जास्त साखर खाल्ल्याने लठ्ठपणा आणि मधुमेहाचा धोका वाढतो आहे. किडनी फेल होण्याच्या कारणांपैकी हे एक मोठे कारण आहे. कोल्ड ड्रींक, पॅकेज्ड स्नॅकस, गोड दही यासारख्या पदार्थांपासून दूर रहावे.

**धूम्रपान आणि मद्याचे सेवन**

सिगारेट आणि मद्यामुळे लिव्हर आणि फफ्फुसाचे नुकसान होतेच, शिवाय किडनीचा रक्तपुरवठा बाधित होतो. किडनीची कार्यक्षमता कमजोर होते. किडनी आणि स्वतःचे आयुष्य वाढवायचे असेल तर धूम्रपान आणि मद्यपानापासून दूर व्हायला हवे.

**फिजिकल ॲक्टिव्हीटी न करणे**

कोणतीही फिजिकल एक्टिव्हीटी न करणाऱ्यांच्या बाबतीत वजन वाढणे, उच्च रक्तदाब आणि किडनी रोगांचा धोका वाढतो. त्यामुळे रोज हल्काफुल्का व्यायाम, योग वा स्ट्रेचिंग करायला हवा. त्यामुळे किडनीचे आरोग्य चांगले राहते.

**सल्ल्याशिवाय औषधे घेणे**

आपण नेहमी छोट्या-मोठ्या दुखण्यांसाठी मेडिकल स्टोअरमध्ये जाऊन औषधे घेतो. ही सवय किडनीला गंभीर स्वरुपात प्रभावित करू शकते.

# दीर्घकालीन बद्धकोष्ठतेमुळे हृदयावर दाब

व्याधी विकार

डॉ. दिलीप शिरसाट

दीर्घकालीन बद्धकोष्ठता केवळ पचनसंस्थेवरच परिणाम करते असे नाही तर ती हृदयावरही दबाव आणू शकते.

**बद्धकोष्ठतेची लक्षणे म्हणजे**

आठवड्यातून तीनपेक्षा कमी मलविसर्जन करणे, कडक, कोरडे मल, मल विसर्जनास त्रास होणे किंवा वेदना होणे, पोट पूर्णपणे रिकामे झाल्यासारखे न वाटणे, पोट फुगणे किंवा अस्वस्थता जाणवणे. बद्धकोष्ठतेच्या कारणांमध्ये फायबरयुक्त आहाराचे प्रमाण कमी असणे, पाणी कमी पिणे, शारीरिक हालचालींचा अभाव, काही औषधे, वेळीच मलविसर्जन न करणे, थायरॉईड समस्या, मधुमेह किंवा इरिटेबल बोवेल सिंड्रोम (आयबीएस) यांचा समावेश होतो.



**बद्धकोष्ठतेचा हृदयावर परिणाम**

बद्धकोष्ठतेमध्ये आतड्यांचे नुकसान, मूळव्याध आणि हृदयाचा धोका वाढणे यांचा समावेश आहे. आतड्यांवर सतत ताण आल्याने रक्तदाबात तात्पुरती पण धोकादायक वाढ होऊ शकते. शौचास ताण देण्याच्या कृतीमुळे छातीवरील दाब वाढतो आणि हृदयाला ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो.

**डॉक्टरांचा सल्ला काय?**

दररोज किमान २ ते ३ लिटर पाणी प्या. रोजच्या आहारात फळे, भाज्या आणि तृणधान्यांचा समावेश करा.

# ओली अंतर्वस्त्रे टाळा

जाणून घ्या

डॉ. सुनील पोटे

पावसाळ्यातील एक मोठी समस्या असते, ती म्हणजे कपडे न वाळणे. ओली अंतर्वस्त्रे आपण अनेक वेळा गरम प्रेसने वाळवण्याचा प्रयत्न करतो. पण तरीही त्यात ओलावा राहतो. अशी ओली अंतर्वस्त्रे घालणे अतिशय धोकादायक असू शकते.



ओली अंतर्वस्त्रे घालल्याने 'युटीआय' होऊ शकतो. युटीआय म्हणजे मूत्रमार्गाचा संसर्ग. हा विकार महिलांना जास्त प्रभावित करतो. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या मते ५० ते ६० टक्के प्रौढ महिलांना त्यांच्या आयुष्यात किमान एकदा तरी 'युटीआय'चा त्रास होतो. ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांमध्ये त्याची शक्यता दुप्पट असते.

ओलावा बॅक्टेरिया आणि बुरशीच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार करतो. ओलाव्याच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने जननेंद्रियाजवळ बॅक्टेरिया आणि बुरशीची वाढ होते. विशेषतः एखादी व्यक्ती सिंथेटिक फॅब्रिक घालते तेव्हा त्यात हवा खेळती राहत नाही, ओलावा बाहेर पडू देत नाही तेव्हा समस्या आणखी वाढते.

**मूत्रमार्ग संसर्गाची लक्षणे**

* वारंवार लघवी होणे
* लघवी करताना जळजळ किंवा वेदना
* पेल्विक क्षेत्रात अस्वस्थता किंवा जडपणा
* ताप

मूत्रमार्ग संसर्गापासून बचाव कसा करावा?

* हवेचा प्रवाह राखण्यासाठी सैल आणि सुती कपडे घाला.
* ओले किंवा अर्धे कोरडे कपडे घालू नका.
* ओले झाल्यास शक्य तितक्या लवकर कपडे बदला.
* दररोज शरीराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्या.

# छातीत का दुखतंय?

आरोग्यवेध

छातीत दुखणं ही सर्वसामान्य समस्या आहे. छातीत दुखण्याची अनेक कारणं असतात. पण बरेचदा छातीत दुखण्याचा संबंध हृदयविकाराशी जोडला जातो. त्यामुळे छातीत दुखू लागल्यावर अनेकजण घाबरून जातात. छातीत दुखणं हे हृदयविकाराचं लक्षण समजून रुग्ण सैरभैर होतो. पण महिलांना मासिक पाळीआधी छातीत दुखू शकतं. जड वस्तू उचल्यामुळेही छातीत वेदना जाणवू शकतात. घाबरल्यामुळे किंवा चिंता, काळजी अशा मानसिक कारणांमुळेही छातीत दुखू शकतं.



* काही कारणांमुळे किंवा घटनांमुळे खूप भीती वाटते. या भीतीमुळे छातीत दुखू शकतं. प्रचंड घबराटीसह छातीत दुखत असेल तर याचा संबंध मानसिक समस्येशी जोडता येईल. म्हणूनच छातीत दुखतंय म्हणून रुग्णालयात धाव घेणाऱ्या अनेकांना हृदयाशी संबंधित कोणतीही समस्या नसते.

* छातीत दुखण्यामागे मानसिक कारणं असतील तर इतर लक्षणंही दिसून येतात. खूप घाम येणं, अंग थरथरणं, धाप लागणं, पोटात गोळा येणं, हातपाय गळल्यासारखं वाटणं, शरीरावरचं नियंत्रण सुटणं अशी लक्षणं असतील तर छातीत दुखण्याचा संबंध हृदयाशी लावता येणार नाही.

* भीतीमुळे छातीत निर्माण होणाऱ्या वेदना फार काळ टिकून रहात नाहीत. साधारण दहा मिनिटांनंतर रुग्णाला बरं वाटू लागतं. हृदयाशी संबंधित समस्यांमुळे छातीत दुखत असेल तर सुरूवातीला वेदनांची तीव्रता कमी असते. ती हळूहळू वाढत जाते.

* मानसिक कारणांमुळे छातीत दुखत असेल तर वेदना छातीपर्यंतच मर्यादित रहातात. हृदयविकाराचा झटका असेल तर छातीतल्या वेदना जबडा, खांदा, हात तसंच शरीराच्या इतर भागांमध्येही पसरतात.

# केस घट्ट बांधल्यामुळे...

कुठे चुकतो आपण?

व्यायाम किंवा घरकाम करताना सर्वसाधारणपणे केस वर घट्ट बांधले जातात. पण यामुळे तुमचं डोकं दुखू शकतं. सतत डोकं दुखत असेल तर त्यामागे केस घट्ट बांधणं हे कारण असू शकतं. केस बांधण्यासाठी इलॅस्टिक रबरचा वापर केला जातो. या रबरमध्ये केस अडकतात, खेचले जातात. कोणतंही काम करताना आपण पटकन रबराने केस बांधून टाकतो. पण यामुळे समस्या सुटण्याऐवजी वाढू शकते. तीव्र स्वरुपाच्या डोकेदुखीमुळे कामावर लक्ष केंद्रित करताना अडचणी येऊ शकतात. तुमच्या डोकेदुखीमागे केसांची रचना किंवा हेअरस्टाईल हे महत्त्वाचं कारण ठरू शकतं.

केस जोरात ओढून इलॅस्टिकच्या रबरने बांधल्यावर टाळूवरची त्वचा आणि केसांची मूळं ओढली जातात. यामुळे डोकेदुखी सुरू होते. मायग्रेनचा त्रास असणाऱ्यांना अशा हेअरस्टाईलमुळे त्रास होऊ शकतो. त्यामुळे वरचेवर डोकेदुखीची समस्या जाणवत असेल तर तुमच्या हेअरस्टाईलकडेही लक्ष द्या. मायग्रेनची समस्या असेल तर केस खूप घट्ट बांधू नका. घट्ट पोनीटेल किंवा घट्ट अंबाडा शक्यतो टाळा. केस बांधण्यासाठी रबरऐवजी पिनचा वापर करा. मायग्रेनचा त्रास नसला तरी केस फार घट्ट बांधणं टाळा. यामुळे तुमचे केसही तुटू शकतात. केस घट्ट बांधल्यामुळे कपाळालगतचे केस विरळ व्हायला सुरूवात होते. त्यामुळे तुमच्या हेअरस्टाईलमध्ये सतत बदल करत रहा.



# हळदीने दूर करा ॲलर्जी

आयुर्वेद आणि विकार

अनेकजणांना विशिष्ट प्रकारच्या वासाचा त्रास होतो. पटापट शिंका येऊ लागतात. काहींना धुळीची ॲलर्जी असते. प्रदूषित वातावरणात गेल्यावर अनेकांचं नाक गळू लागतं, सर्दी होते. यामुळे खूप वैताग येतो. या समस्येवर बरेच उपाय केले जातात. समस्येची तीव्रता, रुग्णाला होणारा त्रास यावरून उपचारांची दिशा ठरते. अशा प्रकारच्या ॲलर्जीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय करू शकता. बहुगुणी हळद तुमची ही समस्या दूर करू शकते. ॲलर्जीची तीव्रता कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींनी हळदीचं सेवन करता येईल.



* हळदीचं दूध लाभदायी ठरू शकतं. चांगले लाभ मिळवण्यासाठी एक कप दूध गरम करून अर्धा चमचा हळद, एक चमचा मध आणि चिमूटभर मिरपूड घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. दूध थंड होऊ द्या. दररोज झोपण्याआधी हे दूध प्या.

* अनेकांना दुधाचा त्रास होतो. असे लोक हळदीचा चहा पिऊ शकतात. यासाठी एक कप पाणी उकळायला ठेवा. त्यात अर्धा चमचा हळद घाला. हळदीचं पाणी भांड्यात ओतून घ्या. त्यात चमचाभर हळद घाला. दिवसातून दोन वेळा हा चहा प्या. या उपायामुळे ॲलर्जीची लक्षणं दूर होऊ शकतील.

* भांडंभर पाण्यात अर्धा चमचा हळद मिसळा, हळदीचं हे पाणी नियमितपणे प्या.

* थोडी ओली हळद घ्या. एक चमचा लिंबाचा रस, दोन चमचे ॲपल सिडर व्हिनेगार आणि एक चमचा मध असं साहित्य घ्या. ओली हळद वाटून घ्या. त्यात मध घाला. लिंबाचा रस आणि ॲपल सिडर व्हिनेगार घालून पेस्ट तयार करा. एका भांड्यात भरून ठेवा. दररोज सकाळी रिकाम्या पोटी हे मिश्रण खा. ॲलर्जीची तीव्रता कमी होईल.

* हळदीचे कोणतेही दुष्परिणाम नसले तरी तिचं सेवन मर्यादित प्रमाणातच करावं. हळदीच्या अतिसेवनामुळे पोट बिघडणं, मळमळणं, जुलाब अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

# चिंताजनक!

आरोग्य चर्चा

डॉ. महेश दळे

'आयसीएमआर' म्हणजेच 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च'च्या आकडेवारीनुसार देशातील १०.१ कोटी लोकांना उच्च रक्तदाब आणि ३१.५ कोटी लोकांना मधुमेह आहे. या आजारांना सायलेंट किलर म्हणतात.

अचानक आपल्याला चक्कर येते, डोकेदुखी होते, श्वास घेण्यास त्रास होतो किंवा जास्त थकवा जाणवतो. या लक्षणांद्वारे शरीर आपल्याला काहीतरी चुकीचे आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करत असते. बहुतेक लोक या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात. ते धोकादायक ठरू शकते. जास्त तहान लागणे, वारंवार लघवी होणे ही लक्षणे मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या सुरुवातीला दिसून येतात. परंतु लोक उष्णता किंवा संपूर्ण दिवसाच्या थकव्याशी त्याचा संबंध जोडून त्याकडे दुर्लक्ष करतात. तसेच उच्च रक्तदाबात डोकेदुखी, चिडचीड आणि थकवा येऊ शकतो. परंतु बहुतेक वेळा ही लक्षणे इतकी सौम्य असतात की लोक तणाव, झोप किंवा अशक्तपणा समजून त्याकडे दुर्लक्ष करतात.

कुटुंबातील एखाद्याला मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाची समस्या असेल तर त्याला जास्त धोका असू शकतो. हे आजार अनुवांशिकदृष्ट्यादेखील धोका बनू शकतात. कुटुंबाचा इतिहास नसेल तर जीवनशैली हेदेखील एक मोठे कारण असू शकते. मधुमेह आणि उच्च रक्तदाबाची लक्षणे वाढत राहतात. हे करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे रोग गंभीर स्वरूप धारण करण्यापूर्वीच वारंवार नियमित तपासणी करून घेणे.




औषधांपेक्षा जीवनशैली सुधारणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्यक्षात औषधे केवळ रोग नियंत्रित करतात. परंतु जीवनशैलीतील बदल औषधांची गरज कमी करू शकतात. व्यायाम, योग्य आहार, पुरेशी झोप आणि चांगले मानसिक आरोग्य राखणे हे या आजारांपासून बचाव करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

**मधुमेह आणि उच्च रक्तदाब टाळण्यासाठी काय करावे?**

* **मीठ आणि साखरेचे सेवन कमी करा:** दैनंदिन आहारात मीठ आणि साखरेचे जास्तीत जास्त प्रमाण ५ ग्रॅम पर्यंत मर्यादित करा.
* **व्यायाम, ध्यान, योग :** दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम,ध्यान, योग करा. यामुळे रक्तातील साखर आणि रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते.
* **७ तास चांगली झोप घ्या:** पुरेशी झोप हार्मोनल संतुलन राखण्यास मदत करते. त्यामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते.

नवसंशोधन

## ...म्हणून कमी होते उत्पादकता

महिलांना मासिक पाळीशी संबंधित बऱ्याच समस्या जाणवतात. या समस्यांमुळे एक वर्षात महिलांचे नऊ उत्पादक दिवस वाया जातात असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. मासिक पाळीशी संबंधित समस्यांमुळे वर्षातले नऊ दिवस महिला पूर्ण क्षमतेने काम करू शकत नाहीत, असं हे संशोधन सांगतं. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. मासिक पाळीदरम्यानही महिलांना काम करावं लागतं. मात्र या काळातल्या शारीरिक समस्यांमुळे उत्पादकता नऊ दिवसांच्या कालावधीइतकी कमी होते. या अभ्यासासाठी संशोधकांनी १५ ते ४५ या वयोगटातल्या ३३ हजार महिलांचा अभ्यास केला.



डोळ्यांचं आरोग्य

## काचबिंदूला प्रतिबंध करा


काचबिंदूमुळे भविष्यात अंधत्व येऊ शकतं. काचबिंदू हा अत्यंत घातक असा नेत्रविकार आहे. डोळे लाल होणं, अंधुक दिसणं, डोकेदुखी, मळमळ ही काचबिंदूची लक्षणं आहेत. काचबिंदूवर तातडीने उपचार करून घेणं गरजेचं आहे. काचबिंदूचं निदान झाल्यानंतर रुग्णाने पोषक आहार घ्यायला हवा. ताजी फळं आणि भाज्यांचा समावेश आहारात करायला हवा. यासोबतच तंबाखू, अल्कोहोल, कॅफेन आणि साखर यांचं प्रमाण कमी करायला हवं. काचबिंदूला प्रतिबंध करण्यासाठी आहारात 'क' जीवनसत्त्वाचा समावेश करायला हवा. व्यायाम, योगासनं तसंच डोळ्यांना पुरेशी विश्रांती देणंही गरजेचं आहे.



जपणूक त्वचेची

## ही जीवनसत्त्वं आहेत गरजेची

आपल्या त्वचेला पोषण हवं असतं. मेक अप उत्पादनं, विविध प्रकारची क्रीम्स वापरली तरी जीवनसत्त्वं, खनिजं यांना पर्याय नाही. हे पोषक घटक आपल्याला आहारातून मिळतात. त्वचेवर वय वाढल्याच्या खुणा दिसू लागतात, सुरकुत्या पडतात, चट्टे दिसू लागतात. हे टाळण्यासाठी आहारात 'अ' जीवनसत्त्वाचा समावेश करा. त्वचेवरच्या सुरकुत्या आणि डाग कमी करण्यासाठी आहारात 'क' जीवनसत्त्वयुक्त फळांचा समावेश करा. 'ई' जीवनसत्त्वही त्वचेसाठी खूप गरजेचं आहे.




आजीबाईचा बटवा

## नियमित खा पेरू

पेरू खूप गुणकारी आहे. म्हणूनच थंडीत पेरू खायला हवा. पेरूमध्ये बरीच खनिजं आणि जीवनसत्त्वं असतात. यामुळे विविध शारीरिक समस्या दूर व्हायला मदत होते. यातलं 'बी ९' हे जीवनसत्त्व जनुकं आणि पेशींना बळकटी देतं. पेरू हृदय आणि पोटाचं आरोग्य राखतो. पेरूमुळे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढते. सतत सर्दी-खोकला होत असेल तर पेरू खाता येईल. पेरूमध्ये 'अ' जीवनसत्त्वही असतं. पेरूमुळे पचनाशी संबंधित समस्याही दूर होतात. लहान मुलांच्या पोटात जंत होतात. पेरू खाल्ल्यामुळे जंतांची ही समस्या दूर होऊ शकते.




# माध्यमांनी अधिक सजग राहण्याची गरज



## महासागर वृत्तपत्र समुहाचे अर्धवार्षिक संमेलन : विदर्भासह मुंबई, नाशिक, पालघर येथील प्रतिनिधींचे भरगच्च उपस्थिती









■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, दि. ५ :**

सद्धयाचा काळ एका विचित्र अवस्थेतून जात आहे. कोणत्या क्षणी एखाद्या पत्रकाराला देशद्रोही ठरविले जाईल, याची शाश्वती राहिली नाही, अशा परिस्थितीत वृत्तपत्र, त्यासाठी काम करणारे पत्रकार आणि एकूणच सर्व समाज माध्यमांनी अतिशय दक्ष आणि सजग राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता, वनराईचे विश्वस्त तथा माजी आमदार डॉ. गिरीश गांधी यांनी केले निमित्त होते दैनिक महासागर वृत्तपत्र समुहाच्या अर्धवार्षिक संमेलनाचे.

माहेश्वर भवन, टेकडी रोड, नागपूर येथे रविवारी आयोजित या संमेलनात मुख्य अतिथी म्हणून डॉ. गिरीश गांधी बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ता अनिल अहिरकर यांच्यासह महासागर वृत्तपत्र समुहाचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, व्यवस्थापकीय संचालक राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, ममता चांडक, सरिता चांडक, सीईओ उमाशंकर लाल मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवर अतिथींचे स्वागत करण्यात आले. अनिल अहिरकर यांनी आजच्या काळातील जिकरीची पत्रकारिता, त्यासाठी घ्यावे लागणार कष्ट, वर्तमानपत्रांची स्थिती यासह संबंधित विषयांवर प्रकाश टाकला.

आपल्या भाषणात डॉ. गिरीश गांधी पुढे म्हणाले की, वर्तमानपत्र चालविणे हे अत्याधिक कष्टाचे काम असून, संकट ओढवून घेण्यासारखे आहे. तथापि, ५५ वर्षापूर्वी श्रीकृष्ण चांडक यांनी वयाच्या २२ व्या वर्षी हे व्रत स्वीकारले आणि तत्वाशी कोणतीही तडजोड न करता आजतागायत हे ओझे वाहिले, हे आजच्या पत्रकारांनी ध्यानात घ्यायला हवे. ज्या माणसाच्या कक्षात तहहयात प्र. के. अत्रे यांचा फोटो लावला असेल, त्या माणसाच्या प्रतिभेबद्दल अधिक सांगणे न लगे, अशा शब्दात त्यांनी श्रीकृष्ण चांडक यांच्या प्रतिभेचा गौरव केला.

वर्तमानपत्र किती मोठे आणि किती लहान, त्याचा खप किती, हे फारसे महत्वाचे नसून, त्यातून काय बोध दिला जातो, हे महत्वाचे असल्याचे सांगत, स्वातंत्र्यपूर्व काळात १३ हजार खपाच्या केसरीने मोठी क्रांती घडवून आणल्याची आठवण त्यांनी करून दिली.

प्रारंभी सीईओ लाल यांनी अर्धवार्षिक संमेलनामागची रूपरेषा स्पष्ट करीत निकट भविष्यात राबवायच्या उपक्रमाविषयी माहिती दिली.

मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी बदलत्या काळानुसार पत्रकारितेच्या क्षेत्रात झालेले बदल, तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे जवळ येत चाललेले जग, पूर्वीच्या काळी वृत्तपत्र चालविण्यासाठी उपसावे लागणारे कष्ट अशा विविध विषयांना हात घालत, पत्रकारांनी अभ्यासू वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले.

५५ वर्षापूर्वी लावलेले महासागरचे रोपटे आता विशाल वृक्षामध्ये रूपांतरीत होवू लागले असून, विदर्भातील ११ जिल्ह्यांसह नाशिक, मुंबई व पालघरमध्ये स्वतंत्र आवृत्त्या सुरू करीत झेप घेणारे हे एकमेव वर्तमानपत्र असल्याचा उल्लेख त्यांनी केला. यासह युवाराष्ट्र दर्शन (मराठी), नागपूर पोस्ट (इंग्रजी) या दैनिकांनीही विदर्भातील वाचकांच्या मनात आपले स्थान निर्माण केल्याचे ते म्हणाले.

या समुहासाठी काम करणारे सर्व प्रतिनिधी, कर्मचारी, वितरक या सर्वांचा महासागर वृत्तपत्राला अधिकाधीक लोकाभिमूख करण्यात मोठा वाटा असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

महासागर, युवाराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट या दैनिकांसाठी मागील सहा महिन्यात उत्कृष्ट जाहिरात व्यवसाय करणाप्रे प्रतिनिधी, आवृत्यांचे स्थानिक संपादक, विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना या कार्यक्रमात अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान, विदर्भासह मुंबई, नाशिक, पालघर येथून आलेले आवृत्ती प्रमुख, जिल्हा प्रतिनिधी यांच्यासह काही तालुका प्रतिनिधींनी आपले अनुभव कथन केले.

महासागर वृत्तपत्र समुहाचे मुंबई येथील डिजीटल विभाग प्रमुख स्वप्नील दुधारे यांनी प्रिंट आणि ईलेक्ट्रानिक मीडिया, त्यांची उपयोगिता, या क्षेत्रात बाळगावयाची खबरदारी आणि संबंधित विषयांवर उपस्थितांना अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. श्रीमती ममता चांडक यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अकोटच्या प्रतिनिधी चंचल पितांबरवाले यांनी केले. या अर्धवार्षिक संमेलनाला विदर्भाच्या कनाकोपऱ्यातील समुहाचे प्रतिनिधी, वार्ताहर, वितरक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**: महासागर :**
**प्रथम पुरस्कार**
रोहित गासे, अमरावती
**द्वितीय पुरस्कार**
नरेंद्र महेश्वरी, गडचिरोली
**तृतीय पुरस्कार**
प्रवीण बतकी, चंद्रपूर

**: युवाराष्ट्र दर्शन :**
**प्रथम पुरस्कार**
मुकेश मिश्रा, गोंदिया
**द्वितीय पुरस्कार**
संजय सावरकर, यवतमाळ
**तृतीय पुरस्कार**
राजेश तायडे, चंद्रपूर

**: नागपूर पोस्ट :**
**प्रथम पुरस्कार**
मुकेश मिश्रा, गोंदिया
**द्वितीय पुरस्कार**
सुनील बोकडे, चंद्रपूर
**तृतीय पुरस्कार**
अशोक बानोरे, यवतमाळ
मनीष जगताप,अमरावती

**: महासागर नागपूर ग्रामिण :**
**प्रथम पुरस्कार**
राजेंद्र सांभार, हिंगणा
**द्वितीय पुरस्कार**
जगदीश सांगोडे, रामटेक
अरुण कराळे, वाडी
**तृतीय पुरस्कार**
राहुल गुप्ता,उमरेड व सुधाकर बागडे, सावनेर

महासागरच्या संपादकीय विभागातून रघुवीरसिंह चव्हाण (यवतमाळ), यशवंत पिगळे (खामगाव), सुरेश कोटांगले भंडारा), गजानन तुपे (मुंबई), नरेंद्र देशमुख (वर्धा), पुरुषोत्तम ढोले (अकोला), मनोज बागडे (नागपूर) तसेच नागपूर पोस्टचे सौम्यजीत ठाकूर (नागपूर) यांनाही सन्मानित करण्यात आले.

-------------

मुंबई आवृत्तीचे सुनील जाधव व गणेश कांबळे, युवाराष्ट्र दर्शनचे गडचिरोली प्रतिनिधी श्यामदेव चाफळे, नागपूर कार्यालयातील सचिन थाटे, काश्मिरा भांगे, पुरण शुंकर, राहुल गुडधे, निलेश लोणार, कोमल पराते, नत्थु पटले, मुकुंद सातपैसे यांना त्यांच्या वैशिष्टपूर्ण सेवेबद्दल गौरविण्यात आले.

महासागरचे सीईओ उमाशंकर लाल, जनसंपर्क अधिकारी कमल नामपल्लीवार तसेच नाशिक आवृत्तीचे प्रमुख जयंत महाजन यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.



































